# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०१६ च्या मसुद्यासाठी काही आदाने

*मानव संसाधन विकास मंत्रालय*

*भारत सरकार*

**अनुक्रमणिका**

१. प्रस्तावना
२. शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वाची आव्हाने
३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची दृष्टी, मिशन, धेय्ये आणि उद्दिष्टे
४. धोरणाचा आराखडा
४.१. बालवाडी/शाळापूर्व शिक्षण
४.२. मुलांच्या आणि प्रौढांच्या/ किशोरांच्या शैक्षणिक अधिकारांचे रक्षण
४.३. शालेय शिक्षणाची फलनिष्पत्ती
४.४. शालेय शिक्षण
४.५. अभ्यासक्रम नुतनीकरण व परीक्षा पद्धतीतील सुधारणा
४.६. समावेशी शिक्षण आणि विद्यार्थ्यांचा आधार
४.७. साक्षरता आणि आजीवन शिक्षण
४.८. शिक्षण व रोजगार क्षमतेतली कौशल्ये
४.९. शिक्षणात आइसीटी चा उपयोग
४.१०. शिक्षकाचा विकास आणि व्यवस्थापन
४.११. शिक्षणातील भाषा आणि संस्कृती
४.१२. व्यापक शिक्षणाद्वारे स्वतःचा विकास
४.१३. शाळा मुल्यांकन व प्रशासन
४.१४. उच्च शिक्षणात प्रशासकीय सुधारणा
४.१५. उच्च शिक्षणातील नियमन
४.१६. उच्च शिक्षणामध्ये गुणवत्तेची हमी
४.१७. मुक्त व दूर शिक्षण व एमओओसी
४.१८. शिक्षणाचे अंतरराष्ट्रीयकरण
४.१९. उच्च शिक्षणातील शिक्षक विकास
४.२०. संशोधन, नाविन्यपूर्णता आणि नवे क्षेत्र
४.२१. शिक्षणासाठी आर्थिक व्यवस्था
५. अंमलबजावणी व देखरेख

**प्रकरण-१**

**प्रस्तावना**

भारताने नेहमीच उच्च शिक्षणाला महत्त्व दिले आहे. प्राचीन भारतामध्ये जी शिक्षण व्यवस्था सुरुवातीला अस्तित्वात होती तिला वैदिक प्रणाली असे म्हणतात. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचा मुलभूत उद्देश्य ज्ञान फक्त या जगात जगण्यासाठी किंवा जीवनापलीकडे नव्हते, तर स्वतःला संपूर्ण जाणून घेण्यासाठी होते. गुरुकुल व्यवस्था गुरु व शिष्यातील बंधन घट्ट करण्यास मदत करून, शिक्षक केंद्रित व्यवस्था निर्माण करते, ज्यात विद्यार्थी कडक शिस्तीचे पालन करतात आणि ते/ त्या त्यांच्या शिक्षकाच्या निश्चित बंधनामध्ये राहतात.

जगातील पहिल्या विद्यापीठाची स्थापना इ.स.पू. ७०० मध्ये तक्षशीलामध्ये झाली होती. नालंदा विद्यापीठ किंवा नालंदा महाविहार म्हणून त्या वेळेस प्रसिद्ध होते, इ.स.पू. ४ थ्या शतकात स्थापन झालेले हे विद्यापीठ जगातील सर्वात उत्तम विद्यापीठांपैकी एक होते. इ.स. ७ व्या शतकात त्याच्या भरभराटीच्या काळात, नालंदा विद्यापीठामध्ये १०,००० विद्यार्थी व २,००० शिक्षक होते. नालंदा विद्यापीठामध्ये शिकविल्या जाणाऱ्या विषयांमध्ये वेगवेगळ्या अध्ययन क्षेत्राचा समावेश केला होता ज्यात, विज्ञान, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र व तर्कशास्त्र आहेत ज्याचा ते काटेकोरपणे वापर अध्यात्मशास्त्र, तत्वज्ञान, सख्या, योग शास्त्र, वेद, आणि बौद्ध व विदेशी तत्वज्ञानाच्या शास्त्रावर करत. पारंपारिक आणि राष्ट्रीय सीमा ओलांडून नालंदा विद्यापीठाने चीन, इंडोनेशिया, कोरिया, जपान, पॅरिस, तुर्की व जगातील इतर भागातील विद्यार्थी व विद्वानांचे लक्ष वेधले होते. भारतीय विद्वान जसे चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, भास्कराचार्य, चाणक्य, पतंजली व वात्स्यायन आणि अन्य काहींनी जगातील ज्ञानात, भर घातली ज्यामध्ये वेगवेगळी क्षेत्रे गणित, खगोलशास्त्र, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकीय शास्त्र आणि शस्त्रक्रिया, ललित कला, यांत्रिक व उत्पादन तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व स्थापत्य शास्त्र, जलवाहतूक व नौकाबांधणी, क्रीडा व खेळ इत्यादी क्षेत्रांमध्ये अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले. स्वतंत्रता चळवळीदरम्यान पुष्कळ पुढारी जसे, गोखले, राम मोहन रॉय, पं. मदन मोहन मालवीय व गांधीजी यांनी भारतातील लोकांच्या चांगल्या शिक्षणासाठी कार्य केले. स्वातंत्र्यापासूनच भारताच्या विकासाची मुख्य कार्यसूची शिक्षणातील सुधारानेशी संबंधित राहिलेला होता. शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे व शिक्षणात सहभागीता वाढविणे, धोरण निर्धारित करणे व कार्यक्रमासाठी आवश्यक प्रवेश वाढवियासाठी वेळोवेळी भारत सरकारद्वारा अनेक आयोगांच्या नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. त्यापैकी काहींचा समावेश केला आहे: विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-४९), माध्यमिक शिक्षण आयोग(१९५२-५३), शिक्षण आयोग (१९६४-६६), व शिक्षकांसाठी राष्ट्रीय आयोग-। व॥ (१९८३-१९८५).

शिक्षणावरील राष्ट्रीय धोरणाचा ठराव (१९६८) राष्ट्रीय आयोगाच्या शिफारशीच्या आधारावर तयार करण्यात आलेला असून, ज्यामध्ये सर्व स्तरावर त्याची गुणवत्ता सुधारणे, व विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास, सामाजिक व नैतिक मूल्यांचे बीजारोपण करणे, आणि लोकांचे जीवन व शिक्षण यांच्यातील घनिष्ठ संबंध स्थापन करणे या शिक्षण व्यवस्थेच्या संपूर्ण पुनर्रचनेवर जोर देत आहे. हा ठराव राष्ट्रीय एकीकरण बळकट करण्यासाठी, संस्कृती व सामान्य नागरीकतेची जाणीव आणि राष्ट्रीय विकासाच्या प्रचारासाठी, शिक्षणाच्या भूमिकेवर जोर देतो. शिक्षणावरील राष्ट्रीय धोरण १९८६ (१९९२ मध्ये सुधारणा) राष्ट्रीय शिक्षण व्यवस्थेचा विचार करते जे “दिलेल्या स्तरापर्यंत, सर्व विद्यार्थी, सर्व जाती, संप्रदाय, स्थान किंवा लिंग, तुलनात्मक दर्जाचे शिक्षण घेतात” हे सुचवते. १९७६ मधील ४२ व्या घटना दुरुस्तीद्वारे समवर्ती सूचीने राज्याच्या यादीमध्ये शिक्षणाचे स्थानांतरण केले ज्यामुळे आपल्या देशाच्या संघीय संरचनेचे महत्त्व ओळखून व संलग्न रीतीने तसेच पुढील शिक्षणाची उद्दिष्टे ठरविण्यासाठी भागीदार म्हणून राज्य व केंद्र सरकारला समान प्राथमिकता देऊन मुलभूत बदल घडवून आणला होता. शिक्षणावरील कोणतेही धोरण राज्यांद्वारे पार पाडली जाणारी महत्त्वपूर्ण भूमिका व संपूर्ण शिक्षण प्रक्रियेचे आंतर-क्षेत्रीय व आंतर-मंत्रालयाच्या स्वरूपाला स्वीकार करते. म्हणून हे धोरण अन्य राष्ट्रीय स्तरावरील धोरणानांसाठी जसे, *बालपणात घ्यावयाची काळजी व शिक्षणावरील राष्ट्रीय धोरण (इसीसीइ)* २०१३, *राष्ट्रीय युवा धोरण(एनवायपी),* २०१४ व २०१५ मध्ये *कौशल्य विकास व उद्योजकता राष्ट्रीय धोरण* व अन्य असंख्य राज्य स्तरीय धोरणांमध्ये स्वीकार केल्यामुळे महत्त्वपूर्ण भूमिका निभावण्यासाठी ओळखले जाते. १९८६/९२ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या निरुपणामुळे, भारत आणि विश्वात मोठ्या प्रमाणात विशिष्ठ बदल घडून आले आहेत. भारताचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विकास हा अशा टप्प्यातून जात आहे ज्यात भविष्यवेधी व मजबूत शिक्षण व्यवस्था आवश्यक आहे. प्रथामिक स्तरावरील शिक्षण प्राप्त करण्यासाठी कायदेशीर आणि संवैधानिक जुळवणीची स्थापना करणे हा भारतातील शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रमुख विकास आहे. संविधानाच्या ( ८६ व्या सुधारणेने) नियम, २००२, मध्ये कलम २१-अ चा समावेश करून राज्यांमध्ये, नियमाद्वारे, निर्धारित करून सहा ते पंधरा वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण या मुलभूत अधिकाराचा विचार भारतीय संविधानामध्ये करण्यात आला. मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा(आरटीइ), २००९ ज्यामध्ये अनुषांगिक कायद्यांचा विचार करून भारतीय संविधानातील कलम २१ - अ नुसार सहा ते चवदा वयातील प्रत्येक पात्र मुलाला जवळील शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत घेण्याचा अधिकार आहे.

शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत. शैक्षणिक उपक्रम आणि अध्ययन प्रक्रिया फक्त वर्गापुरतीच मर्यादित राहिलेली नाही, आणि म्हणून शिक्षणाचे क्षेत्र हे औपचारिक शिक्षण किंवा उच्च शिक्षणापुरते मर्यादित राहिले नाही. शिक्षण प्रक्रिया ही फक्त शाळेतील पाठ्यक्रमावर आधारित नसून, ती

प्रसार माध्यमे इलेक्ट्रोनिक अणि प्रिंट दोन्ही, माहिती व संचार तंत्रज्ञान आणि पुस्तके व नियतकालिके इत्यादींवर आधारित आहे. आज विद्यार्थी अशा गैर-संस्थांमधून अधिक वर्तमान ज्ञान प्राप्त करत आहेत.

सध्याच्या पिढीचे गतिमान पाऊल आणि नवीन ज्ञानाचा अनुप्रयोग, विशेषतः विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आणि सामान्य लोकांच्या रोजच्या जीवनावर त्याचा होणारा परिणाम यातून सतत बदलत जाणाऱ्या ज्ञानाच्या जगात विद्यार्थ्यांचा परिचय देऊन त्यांच्यावर लक्ष केंद्रित करतात व महात्त्व देतात. आज मानवी कौशल्यांच्या विकासाची गरज आहे, जीवन कौशल्ये सुद्धा, ज्यात समाज आणि अर्थव्यवस्थेवर प्रकाश टाकण्यासाठी उद्योन्मुख ज्ञानाची आवश्यकता असते, ज्यात आयुष्यभर विद्यार्थ्यांद्वारे बदलणाऱ्या आवश्यक कौशल्याचा स्वीकार करण्यासाठी क्षमतेचा विकास करून, ज्ञान आणि कौशल्ये अर्जन करण्यासाठी चालना देण्याची आवश्यकता असते. समानतेचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षणाचा सामाजिक संदर्भ त्याच बरोबर राष्ट्राशी संबंधित बदल आणि एका बदलत्या दृष्टीकोनाच्या मागणीचा समावेश, सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या शिकण्याच्या अनुभवात यशस्वी होण्यासाठी संध्या वाढविणे आणि सर्वांसाठी समान शैक्षणिक परिणाम निश्चित करून त्यासाठी विविध गटातील विद्यार्थ्यांच्या लोकासंखेनुसार सर्व शैक्षणिक संस्थाना शैक्षणिक गरजेनुसार जबाबदार बनवणे.

मागील काही वर्षांमधील विशेषतः इन्टरनेटच्या प्रसारामुळे माहिती आणि संचार तंत्रज्ञानाचा प्रसार व वापर वाढला आहे. हे नवीन तंत्रज्ञान लोकांचे राहणीमान, कार्य आणि संप्रेषणामध्ये बदल घडवून आणत आहे. नवीन तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांसाठी शिकण्याच्या नवीन संधी, माहिती आणि नवीन संसाधनांच्या स्त्रोतांचा पुरवठा सहज उपलब्ध करून देतात. नवीन तंत्रज्ञानाला शिक्षणासोबत नीट एकत्रित करून शिक्षण क्षेत्रामध्ये प्राथमिक कार्य केले आहे.

वरील विकास सुचवितो की शैक्षणिक धोरण आणि शिक्षणाची सामग्री व प्रक्रिया बदलत्या वेळ आणि गरजेनुसार विकसित होणे खूप गरजेचे आहे. शिक्षणाची उद्दिष्ट्ये, संरचना, सामग्री आणि प्रक्रिया, सूचना आणि त्याच्याशी संबंधित भूतकाळातून मिळालेले अनुभव डोळ्यासमोर ठेवून नूतनीकरणाची गरज आहे, ज्यामुळे राष्ट्राच्या विकासाची बदलती उद्दिष्टे आणि सामाजिक गरजा त्याचबरोबर स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि वैश्विक वस्तुस्थिती आणि बदल ज्यात मुले, तरुण आणि वयस्क यांच्या शिकण्याच्या बदलत्या गरजा यांच्यावर लक्ष केंद्रित करता येते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०१६ ज्याची रचना भारतातील शिक्षण प्रक्रियेचे नुतनीकरण करून मार्गदर्शन करण्याच्या दिशेने केलेला एक प्रयत्न आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०१६ एक अशा विश्वस्त शिक्षण व्यवस्थेची कल्पना करते, जी सुनिश्चित समावेशी गुणवत्तापूर्ण शिक्षणायोग्य आणि सर्वांसाठी जीवनभर शिकण्याच्या संध्या आणि ज्ञान, कौशल्ये, अभिवृत्ती

आणि मूल्यांनी सुसज्ज विद्यार्थी/पदवीधर निर्माण करणारे आहे जे देशाच्या विकास प्रक्रियेला, उत्पादक जीवनाकाडे घेऊन जाणारे आहे, सदैव वैश्विक ज्ञान आधारित समाज, गतिमान बदलणाऱ्या गरजांनुसार प्रतिसाद देणारे आणि जबाबदार नागरिकांचा विकास करणारे जे भारतीय परंपरा, संस्कृती आणि इतिहासतील विविधतेचा स्वीकार करून भारतीय परंपरेचा सम्मान करतील, आणि धार्मिक मैत्री व सामाजिक सलोख्याला चालना देणारे असेल. ही दृष्टी भारतातील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकासामध्ये शिक्षणाच्या मुख्य भूमिकेसाठी ओळखली जाते. महात्मा गांधी म्हणाले होते की, *"वास्तविक समस्या ही आहे की, खरे शिक्षण काय आहे याची लोकांना कल्पना नाही. आपण शिक्षणाचे मुल्यांकन त्या प्रकारे करू शकतो ज्या प्रकारे जमिनीचे किंवा शेअर बाजारातील शेअरचे मुल्यांकन. आपण फक्त तेच शिक्षण द्यायला पाहिजे जे अधिक कमाई करण्यास मदत करू शकेल. आपण शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी कोणताही विचार देतो."* राष्ट्रापित्याच्या विचारांनी प्रभावित होऊन, हे धोरण शिक्षणाची भूमिका मुल्यांमधून बिम्बविते, कौशल्यांच्या पुरवठा करून आणि नागरिकांच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करते, आणि राष्ट्राच्या कल्याणासाठी महत्वपूर्ण योगदान देते. हे दीर्घकालीन आर्थिक वृद्धी आणि बारकाईने शिक्षण व्यवस्थेच्या उत्पादकांच्या गुणवत्तेवर आधारित राष्ट्राचा विकासासाठी ओळखले जाते, आणि ती शिक्षण व्यवस्था समानता व गुणवत्तेचा परिसर निर्माण करून समाज आणि अर्थव्यवस्थेचे उदयोन्मुख ज्ञान यशस्वीपणे प्राप्त करत आहे आणि शाश्वत विकासाला केंद्रित करत आहे. ते शिक्षणाला सामाजिक- आर्थिक गतिशीलता आणि मानवी समाज व समान न्याय उभारणीसाठी महत्त्वपूर्ण साधन असून, सर्वात जोरदार साधन म्हणून ओळख करून देत आहे. ते शिक्षण हे समाजामध्ये एकीकृत शक्ती म्हणून सुद्धा ओळखले जात आहे आणि त्याची भूमिका महत्त्वपूर्ण आहे जी राष्ट्रीय ओळख व सामाजिक सलोखा वाढविते. हा दृष्टीक्षेप सुचवितो की चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण स्थानिकता तसेच वैश्विकतेचे एकत्रीकरण करण्यास मदत करेल, ज्याचे मूळ भारतीय संस्कृती आणि परंपरेत खोलवर रुजलेले आहे त्यासोबत भारतीय मुले व तरुणांना वैश्विक नागरिक होण्यास सक्षम करेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०१६ येणाऱ्या काही वर्षांमध्ये संपूर्ण भारतभर शिक्षणाच्या विकासाची चौकट तयार करून देईल. ते मागील शैक्षणिक धोरणातील ध्येये आणि लक्ष यांच्या उद्देश्यपत्रिकेशी संबंधित अपूर्णता आणि सध्याचा व उदयोन्मुख राष्ट्रीय विकास दोन्ही आणि शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित समस्या शोधण्याचा प्रयात्त करेल. राष्ट्रीय विकासातिल गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन, एनइपी २०१६ सर्व स्तरावरील शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रित करेल आणि असे सुनिश्चित करते की समाजातील सर्व स्तरांना शिक्षणाची संधि उपलब्ध करून देणार आहे.

सर. अरबिंदो यांच्या शब्दात, *"भारतीयांना हा दृढ निश्चय असणे आवश्यक आहे की, भारताचा विकास नक्की होईल आणि तो महान होईल आणि प्रत्येक घडलेल्या गोष्टी, प्रत्येक समस्या, प्रत्येक प्रतिकूल परिस्थिती त्याला पुढे जाण्यास नक्कीच मदत करेल. इथे रात्र संपेल आणि क्षितिजावर सूर्य उगवेल.*

*भारताच्या भाग्याचा सूर्य उगवेल आणि तो आपल्या प्रकाशाने संपूर्ण भारताला प्रकाशित करेल आणि याने भारत प्रकाशित होईल आणि आशिया प्रकाशित होईल आणि संपूर्ण विश्व प्रकाशित होईल."* २१ वे शतक हे भारताचे असेल.

## प्रकरण -२

## शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वाची आव्हाने

ग़ाआधीच्या शैक्षणिक धोरणानी त्यांची उदिष्टे व ध्येये स्वच्छ शब्दात मांडली होती. परंतु त्यातील अनेक पूर्णपणे साध्य झालेली नाहीत. जरी भारताने शिक्षणाच्या सर्व स्तरांमधे प्रवेश करण्यात अभिवृद्धी आणि त्यातील सहभाग यात लक्षणीय प्रगती केलेली असली तरी देशातील शैक्षणिक विकासाचे एकंदरीत चित्र संमिश्र आहे, आणि *शिक्षणात प्रवेश व त्यात सहभाग, शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षणातील समतुल्यता, प्रणालीची कार्यक्षमता, प्रशासन आणि व्यवस्थापन, संशोधन व विकास, आणि शैक्षणिक विकासातील आर्थिक प्रतिबद्धता* यासंबंधातील दीर्घकालीन चालत आलेल्या काळज्या आणि आव्हाने बरीच आहेत.

**प्रवेश व सहभाग**

विश्वभरात केल्या गेलेल्या संशोधनात लहानपणी लवकर शिक्षणाचा प्रारंभ याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. तथापि, पूर्व-शालेय शिक्षणातील सहभाग हा कमीच आहे औपचारिक शिक्षणाकरता त्यांना चांगल्या प्रकारे तयार करण्याकरता सर्व मुलांना समान संधी पुरवण्यासाठी, लवकर लहानपणी शिक्षणात प्रवेशाची मर्यादा वाढवणे ह्या कार्याला अग्रकम देणे आवश्यक ठरले आहे.

सन २००० पासून ६-१३ वर्षे वयाचे शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्येची टक्केवारी राष्ट्रीय स्तरावर बरीच घटलेली आहे. परंतु, तरीही शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या ही जास्तच आहे. प्राथमिक शाळेत नाव नोंदवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची घटती संख्या हा काळजीचा विषय आहे. सार्वत्रिक माध्यमिक शिक्षण प्राप्त करण्याकरता विद्यार्थ्यांचे प्राथमिक पासून ते माध्यमिक पर्यंत आणि माध्यमिक शिक्षणापासून ते उच्च माध्यमिक आणि तृतीयक शिक्षण असे विद्यार्थ्यांचे उर्ध्वगामी संक्रमण/ गतीमानता हे अजूनही एक आव्हान आहे.

जगातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी उच्च शिक्षण प्रणाली भारतात अस्तित्वात आहे. जरी भारतीय उच्च शिक्षण हे समाजोन्भिमुख झाले आहे तरी उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण (GER) हे २०१४-१५ मध्ये २३.६ % इतके कमी आहे. सध्याचे लक्ष्य हे २०१७-१८ मध्ये GER २५.२ % पर्यंत आणि पुढे २०२०-२१ मध्ये ३० % पर्यंत वाढवण्याचे आहे.

निरक्षरांची संख्या कमी करण्याच्या प्रयत्नात होणारी अपेक्षेपेक्षा मंद प्रगती हा एक काळजीचा विषय बनला आहे. भारतात सध्या निरक्षरांची लोकसंख्या जगात सर्वाधिक आहे; ती सन २०११ मधे ७ वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकसंख्येत निरक्षरांची एकूण संख्या २८२.६ दशलक्ष इतकी आहे. भारतात तरूण व प्रौढ

निरक्षरांची संख्या जगात सर्वाधिक आहे; भारतात तरूण [१५-२४ वर्षे] व प्रौढ [१५ वर्षे व त्यापेक्षा अधिक] साक्षरांची संख्या २०११ मध्ये क्रमशः ८६.१% आणि ६९.३ % इतकी आहे

**गुणवत्ता समस्या**

शिक्षणातील हीन दर्जा हा अध्ययनाच्या असमाधानकारक निष्पत्तीचे कारण बनतो हा एक मोठा काळजीचा विषय आहे. गुणवत्तेशी संबंधित उणीवा जसे अयोग्य पाठ्यक्रम, प्रशिक्षित अध्यापकांचा अभाव आणि अकार्यक्षम अध्यापनशास्त्र हे पूर्व शालेय शिक्षण संबंधातील मोठी आव्हाने आहेत. लक्षणीय प्रमाणातील मुले जी पूर्व -शालेय शिक्षण पूर्ण करतात अन् जेव्हा ते शाळेत प्रवेश घेतात तेव्हा त्यांच्यात संज्ञानात्मक व भाषेच्या क्षेत्रातील शाळेत जायच्या तयारीसाठीच्या क्षमता नसतात.

प्राथमिक शाळा. बहुतेक पूर्व-शालेय शिक्षणतज्ञ अध्यापक हे पुरेसे प्रशिक्षित/ तयार नसतात. बऱ्याच बाबतीत पूर्व-शालेय (बालवाडी) अभ्यासक्रम हा प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमाचा अधोगामी विस्तार (वाढ) म्हणून वापरला जात आहे.

असमाधानकारक पातळीवरील विद्यार्थ्यांचे अध्ययन हे शालेय शिक्षणाचे सर्वात मोठे आव्हान आहे वर्ग ३, ५, ७, व १० ह्या इयत्तेतील केलेल्या राष्ट्रीय उपलब्धी सर्वेक्षणाचे निष्कर्ष असे सूचवतात की लक्षणीय प्रमाणातील मुलांची अध्ययनाची पातळी ही अपेक्षित अध्ययनाची पातळीच्या तोडीची नव्हती. प्राथमिक व उच्च प्राथमिक टप्प्यातील अध्ययनाची निकृष्ट गुणवत्ता ही विद्यार्थ्यांच्या माध्यमिक टप्प्यातील अध्ययनावर परिणाम करते. माध्यमिक टप्प्यातील अध्ययनाची निकृष्ट गुणवत्ता ही विद्यार्थ्यांच्या महाविद्यालय/विद्यापीठ वर्षांमध्ये ओसंडून संक्रमित होते, आणि परिणामतः उच्च शिक्षण क्षेत्रात निकृष्ट दर्जाची निष्पत्ती प्रदर्शित होते.

शालेय शिक्षणच्या असमाधानकारक गुणवत्तेत कित्येक घटकांचे योगदान आहे. यामध्ये समावेश असणारे काही असे आहेत: विहित नियम व मानकांचे पालन न करणाऱ्या कित्येक शाळा मोठ्या प्रमाणा अस्तित्वात आहेत; विद्यार्थी आणि शिक्षक यांची अनुपस्थिती; शिक्षकांची प्रेरणा व प्रशिक्षण यामधील गंभीर स्वरुपाचे अंतर हे शिक्षकाची गुणवत्ता व कार्यप्रदर्शन यात उणीवा निर्माण करते; शिक्षणात माहिती आणि संचार-संपर्क तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत धीमी प्रगती, उप-इष्टतम कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन, कार्यप्रदर्शनाचे निरीक्षण व पर्यवेक्षण करण्यावर अपुरे लक्ष देणे ई. शासकीय प्रणालीतील शाळांमधे चांगल्या दर्जाचे शिक्षण देण्यातील ज्ञात अपयश, त्यामुळे असंख्य खासगी शाळा निर्माण झाल्या आहेत, ज्यातील अनेकांमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा, अध्ययनाला योग्य वातावरण, आणि सक्षम शिक्षक यांचा अभाव आहे.

मोठ्या संख्येतील उच्च शिक्षणाच्या संस्थामध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता ही एक काळजीची बाब आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढवण्याकरता गुणवत्तेची हमी देण्याचा एक उपाय म्हणून भारतात सन १९९४ मधे प्रमाणन (ॲक्रिडिटेशन) एजन्सींची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदे नॅक(NAAC)) द्वारे मान्यताप्राप्त एकूण १४० विद्यापीठांपैकी, फक्त ३२ टक्के ए ग्रेडच्या आहेत. N(नॅक) द्वारे मान्यताप्राप्त एकूण २,७८० महाविद्यालयांपैकी, फक्त ९ टक्के ए ग्रेडची आहेत. मान्यताप्राप्त संस्थांपैकी, विद्यापीठांपैकी ६८ टक्के आणि महाविद्यालयापैकी ९१ टक्के ही नॅक (NAAC) द्वारा निर्दिष्ट गुणवत्ता मापदंडा(पॅरामीटर्स) च्या अनुसार सरासरी किंवा सरासरीपेक्षा कमी दर्जाची लेखली गेली आहेत. अनेक खासगी महाविद्यालये व विद्यापीठे जागोजागी बोकाळली आहेत, त्यातील अनेकात गुणवत्तेचे नामोनिशाण नाही. उच्च शिक्षण उप-विभागावर मर्यादा आलेली आहे, यामुळे- रिक्त पदांमुळे उत्तम-अर्हता असलेल्या अध्यापकांची वानवा आहे; अनेक खासगी तसेच ठळक प्रमाणातील सार्वजनिक उच्च शिक्षण संस्था यात पायाभूत सुविधा निकृष्ठ आहेत; वैविध्यपूर्ण अर्थव्यवस्थेतील मागणीनुसार कौशल्याशी जवळजवळ तंतोतंत जुळण्याकरता उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे पुनर्नवीकरण करण्यात मंद प्रगती; आणि संशोधन आणि विकास याकरता अपुरे निधी उपलब्ध.

**कौशल्य आणि रोजगारभिमुखता**

संपूर्ण जगात भारत हे एक सर्वात जास्त तरूण राष्ट्र आहे जिथे तिच्या एकूण लोकसंख्येतील ५४ टक्केपेक्षा जास्त लोकसंख्या ही २५ वर्षांहून कमी वयाची आहे. यामुळे हे गरजेचे आहे की देशातील तरूण वर्ग हा शिक्षण व प्रशिक्षण याद्वारे कर्मचारी वर्गात प्रवेश करण्याकरता कौशल्य व ज्ञान यांनी सुसज्ज झाला पाहिजे. तथापि, तांत्रिक व व्यवसायाभिमुख शैक्षणिक कार्यक्रमांना आधार देणारी संस्थात्मक व्यवस्था अजूनही अपुरी आहेत. व्यावसायिक क्षेत्राशी कौशल्याचा विकास औपचारिकपणे जोडणे, आणि विद्यार्थ्यांच्या समांतर व लंबाकार (आडव्या व उभ्या) हालचालींचे मार्ग असलेल्या व्यावसायिक उपलब्धीमध्ये शैक्षणिक तुल्यता आणणे ह्याचा प्रयास फक्त नुकताच केला गेला आहे. उत्कृष्ट दर्जाच्या व्यावसायिक प्रशिक्षणाला सामाजिक स्वीकृती व प्रतिष्ठा जोपासण्याकडे अधिक लक्ष वेधणे गरजेचे आहे.

शैक्षणिक प्रणालीच्या मोठ्या प्रमाणातील परिपाकात व्यवसायाभिमुख कौशल्याची उणीव आढळून आली आहे. त्यामुळे उच्च शिक्षण प्रणालीची विश्वासपात्रता बऱ्याच प्रमाणात खालावली आहे. रोजगार खात्रीने मिळवून देण्याची उच्च शिक्षणाच्या उपयुक्तता हे अजूनही प्रश्नचिह्नच आहे. अनेक स्नातक आणि स्नातकोत्तर पदवीधारक विद्यार्थी यांना त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रात नोकऱ्या मिळत नाहीत. शैक्षणिक प्रणालीच्या परिपाकात (उत्पादन)व्यवसायाभिमुखता वाढवण्याच्या कार्याला अग्रक्रमाने प्राधान्य दिले गेले पाहिजे.

**अभ्यासक्रम आणि मूल्यांकन**

विद्यमान शाळा व उच्च शिक्षण अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रम आव्हाने (थ्रस्ट्स), ज्यांची विद्यार्थ्यांना ह्या वेगाने बदलत्या जगात एक योग्य सभ्य काम व चांगले जीवन मिळवून देण्यास आवश्यक संबंधित कौशल्ये प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहन देण्यास गरज आहे, यांच्यामधे काही संबंध अस्तित्वात नसल्याची वाढती जाणीव आहे. संबंधित कौशल्ये, ज्यात नोकरी आणि उद्योजकता याकरता आवश्यक असणारी कौशल्ये यांचा समावेश आहे; कौशल्ये व क्षमता जी शिकणाऱ्याला अधिक सृजनात्मक व कल्पक होण्यास, चिकित्सकपणे विचार करण्यास, प्रभावी रीतिने संवाद साधणे, स्वतंत्रपणे प्रश्न सोडवणे; आणि जीवनाची कौशल्ये जी एखाद्या व्यक्तीला एक जबाबदार नागरिक बनण्यास मदत करतात आणि सांस्कृतिक विविधता स्वीकारण्यास, एकमेकांबरोबर एकोप्याने मैत्रीने जगण्यास व काम करण्यास समर्थ बनवतात, ई. ती सर्व संपादित करण्याच्या सुसंधीमधे वाढ करणे हे या संदर्भात महत्वाचे आव्हान आहे. शाळा व महाविद्यालय/ विद्यापीठ यांच्या स्तरावर मूल्यांकन करण्याच्या एकंदर प्रथा अजूनही असमाधानकारक आहेत. अध्ययनाच्या उपलब्धीच्या मूल्यांकनाच्या बऱ्याच बाबतीत कंठस्थ करून शिकणे व विषय ज्ञानाला पुनः जसेच्यातसे व्यक्त करणे ह्याची विद्यार्थ्यांची क्षमता तपासणे ह्यावर अजूनही केंद्रित केले जाते. संपूर्ण मूल्यांकन प्रणाली ही बदलण्याची गरज आहे, जेणेकरून, विद्यासंबंधी व सह-विद्यासंबंधी दोन्ही क्षेत्रा (डोमेन)तील अध्ययनाची निष्पत्ती यासह विद्यार्थ्यांचे व्यापक मूल्यांकन केले जाण्याची खात्री केली जाईल.

**माहिती व संपर्क तंत्रज्ञान (आयसीटी ICT)**

गेल्या दोन दशकात माहिती व संपर्क तंत्रज्ञान (आयसीटी ICT) यांनी प्रगतीमध्ये वेगाने कूच केले आहे. देशात अनेक प्रयोग केले गेले आहेत, आणि ICTयाचा शिक्षणात वापर करण्याच्या संदर्भात ज्ञानाचा महानिकाय संग्रहित केला गेला आहे. तथापि, ICTची शिक्षणातील क्षमता पूर्णतया वापरली गेली नाही. शिक्षणातील ICTचा वापर हा मर्यादित राहिला आहे आणि उत्तम शिक्षणाच्या जोपासनेकरता ICTच्या वापराच्या प्रयत्नांना गती देणे आवश्यक आहे.

**शिक्षकाचा विकास आणि व्यवस्थापन**

जरी शिक्षकाचा दर्जा व कार्यप्रदर्शन यात सुधारणा करण्याचे निरंतर प्रयत्न करूनही, प्रारंभिक व्यावसायिक तयारी आणि शालेय शिक्षकाचा व्यावसायिक विकास चालू ठेवणे यासाठीच्या प्रणालीत अजूनही कित्येक उणीवा आहेत. शिक्षकाचे अपेक्षित नवे प्रोफाईल व भूमिका यांचा सामना करण्याकरता आणि वैविध्यपूर्ण सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व तांत्रिक वातावरणात त्यांची कामे-कर्तव्ये पार पाडण्याकरता लागणाऱ्या क्षमता यांनी शिक्षकांना सुसज्ज करणे याबाबतीत वर्तमान शिक्षक अध्ययन व प्रशिक्षण कार्यक्रम हे अनुपयोगी समजले जातात. संस्थात्मक क्षमता आणि शिक्षकांचा आवश्यक पुरवठा यामधील निरंतर असमानतेची परिणती शिक्षकांच्या कमतरतेत होते. ही समस्या देशाच्या पूर्व भागात तीव्र आहे जिथे अप्रशिक्षित शिक्षक अत्यधिक प्रमाणात साठून राहिले आहेत. ह्या राज्यांमधे शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची क्षमताही अत्यंत मर्यादित आहे. शिक्षकांच्या अध्यापनात संशोधन, प्रयोग आणि अभिनव कल्पना ह्या

अतिशय मर्यादित राहिलेल्या आहेत. ह्या उणीवांमुळे शिक्षकांची व्यावसायिक ओळख पुसत चालली आहे आणि शिक्षक एक व्यवसाय म्हणून दर्जा घसरत आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या निष्पत्तीत सुधारणा आणण्यासाठी शिक्षकांची क्षमता, प्रेरणा, व उत्तरदायित्व यांच्याशी संबंधित समस्यांना संबोधित करण्याची निकड आहे.

**समतुल्यता (इक्विटी) समस्या**

पूर्व-शालेय (बालवाडी) शिक्षणासाठीच्या नोंदणीत वाढ साध्य करण्यात भरघोस प्रगती झाली असली तरी, वंचित लोकसंख्या गटातील मुलांना अजूनही पूर्व-शालेय (बालवाडी) शिक्षणात प्रवेश संभव नाही. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गातील मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षण मिळण्याच्या संधी कमी असणे जास्त संभव आहे.

बरीच प्रगती होऊनही काही राज्यांमध्ये उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात नोंदणी दर अजूनही राष्ट्रीय सरासरी पेक्षा कमी राहिला आहे. जरी माध्यमिक शिक्षणाच्या मागणीत वाढ झालेली आहे आणि माध्यमिक शाळांची संख्याही वाढलेली आहे, तरी माध्यमिक शिक्षणाची संपूर्ण देशभरात वाढ असमान आहे. ही प्रादेशिक तफावत चालूच आहे तसेच विद्यार्थ्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीवर अवलंबून प्रवेशातही फरक आहे.

जरी सन २००० पासून शाळेबाहेर राहणाऱ्या (OOSC) संख्येत लक्षणीय घट झाली आहे तरी, शाळेबाहेर राहणाऱ्या मुलांची संख्या व प्रमाण हे काही राज्यांमधे राष्ट्रीय सरासरी पेक्षा अतिशय अधिक आहे. एस सी (SC) मुले, एस टी (ST) मुले व मुस्लीम मुले यामधील OOSC मुलांचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक राहिले आहे. ह्या मुलांकडे जास्त व केंद्रीभूत लक्ष दिले गेले पाहिजे असे हे दर्शवते.

उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी गुणोत्तर (GER) मधील प्रादेशिक तफावत फार अधिक आहे. सन २०११-१२ मधे

उच्च शिक्षणातील GER हा झारखंडमधे ८.४ टक्के आणि चंदीगडमधे ५३ टक्के आहे. तसेच, सामाजिक गटातील बदल हेही विचारात घेण्याजोगे आहेत सन २०१४-१५ मधे उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी गुणॊत्तर हे २३.६ टक्के इतके कमी आहे (२४.५ % मुलांसाठी, २२.७% मुलींसाठी; १८.५ % SC करता आणि १३.३ % STs करता). भारतात उच्च शिक्षण क्षेत्रात सामोरे जावे लागणाऱ्या आव्हानातील एक आव्हान हे विस्ताराच्या गरजांचा समतुल्यता विचारात घेऊन मेळ घालावा लागेल.

प्राथमिक शिक्षणापासून वंचित लोकसंख्या गटांमध्ये नोंदणी आणि त्यांना टिकवून ठेवणे हे सोईचे जावे याकरता बहुतेक राज्यांमध्ये समावेशक धोरणे यशस्वीरित्या लागू केली आहेत. असे प्रयत्न करूनही लोकसंख्येतील काही विशिष्ट वर्गातील मुलांना उदा., अपंग मुले, दूर निर्गम भागातील मुले,भटक्या

जमातीतील मुले, स्थलांतरित मुले आणि इतर असुरक्षित / वंचित गट यांना, शैक्षणिक संधींचा पुरेपुर फायदा घेता आला नाही. शहरी गरीब मुले हे आणखी एका गटाचे प्रतिनिधीत्व करतात ज्यांचा शिक्षणातील सहभाग कमी आहे. सार्वभौमिक प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण प्राप्त करण्यासाठीच्या प्रयत्नाच्या संदर्भात अतिशय दूर-दुर्गम ठिकाणच्या लोकसंख्येतील गटाला शिक्षणात प्रवेश सुनिश्चित करणे हा एक महत्वपूर्ण अग्रक्रम मानला गेला आहे.

राष्ट्रीय अध्ययन महत्कार्य सर्वेक्षण याचे निष्कर्ष असे दाखवतात की राज्ये / केंद्रशासित प्रदेश यांच्यामधे विद्यार्थ्यांना सरासरी यशाच्या पातळीत लक्षणीय फरक दिसून येतो. ते असेही सूचित करतात की देखील शहरी विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा लक्षणीयरित्या चांगले कार्यप्रदर्शन करत आहेत; खासगी विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थी सरकारी शाळातील विद्यार्थ्यांच्यापेक्षा किंचितच चांगले कार्यप्रदर्शन केले; तर सर्वसामान्य वर्गातील व ओबीसी वर्गातील विद्यार्थ्यांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांपेक्षा जास्त चांगले कार्यप्रदर्शन केले. या संशोधनातील निष्कर्ष 'शिक्षणातील समतुल्यता (इक्विटी)'च्या ध्येयाला एक गंभीर आव्हान सूचित करतात. ऐतिहासिकदृष्ट्या वंचित मुले आणि समाजातील आर्थिक दृष्ट्या कमजोर वर्गातील मुले आणि पहिल्या पिढीतील शिकणारी मुले ही लक्षणीयरित्या कमी पातळीवर शिक्षण निष्पत्ती दर्शवतात.

विकलांग मुले व विशेष आवश्यकता वाली मुले ही जास्त प्रमाणात शाळेबाहेर राहणाऱ्या (आउट-ऑफ-शाळा) मुलांमधील वर्गात मोडतात. ही परिस्थिती सामाजिक, शैक्षणिक अशा दोन्ही पातळीवर वंचित विकलांग मुलांच्या आव्हानात्मक गरजांना संबोधित करण्याकरता शाळांना साधनांनी सुसज्ज करण्याची गरज अधोरेखित केली आहे.
जरी सर्व प्रकारच्या श्रेणीतील विद्यार्थ्यांच्या बाबतीत अर्ध्यातून सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दराबाबत चिंतेचा विषय असला तरी, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागास वर्ग, विशेषत: या गटातील मुली, यांचा अर्ध्यातून शाळा सोडून जाणाऱ्यांचा दर हा राष्ट्रीय सरासरी पेक्षा अधिक आहे. सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागास परिस्थितीतील समुदायातील मुलांनी शाळेत येत राहणे सुधारण्यासाठी उपाय हाती घेण्याची गरज असल्याचे लक्षात आणले आहे.

बहुतेक राज्यांमध्ये / केंद्रशासित प्रदेशांनी सहभागातील लैंगिक भेदभाव कमी करण्यात लक्षणीय प्रगती केली आहे, त्यापैकी बहुतेक सर्वांनी एकतर लैंगिक समानता साध्य केली आहे किंवा त्याच्या पलीकडेही गेले आहेत, विशेषतः शिक्षण प्राथमिक आणि उच्च प्राथमिक टप्प्यात. तथापि, मोठ्या तफावती उच्च माध्यमिक पातळीवर तशाच राहिल्या आहेत. बऱ्याच मुलींना शाळेत पाठवत नाहीत; आणि ज्या माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात अशा कित्येक मुली त्यांचे शिक्षण उच्च माध्यमिक पातळीवर व महाविद्यालयात चालू ठेवू शकत नाहीत. एकदा शाळेत असल्यावर, विशेषतः माध्यमिक टप्प्यात, अनेक असे अडथळे आहेत जे - बऱ्याच प्रमाणातील मुलींना त्यांचे शिक्षण पुढे चालू ठेवण्यास प्रतिबंध करते. लिंग आणि सामाजिक वर्गातील अंतर बुजवण्याचे मध्यस्थीचे उपाय सध्या योजले जात आहेत ते वाढवण्याची गरज आहे, आणि मुली आणि इतर

विशेष श्रेणीतील मुले यांचा समावेश व प्रभावी सहभाग यासाठी सुविधा निर्माण करण्याकरता अधिक व्यूहात्मक योजना तयार करणे आवश्यक आहे.

तरुण आणि प्रौढ साक्षरता दर यातील तुलनात्मक अधिक लिंग अंतर एक मुख्य आव्हान आहे. सन २०११ मधे पुरुष और महिला लोकसंख्येत (वय १५-२४ वर्षे) युवा साक्षरता दर हा अनुक्रमे ९० टक्के आणि ८१.८ टक्के असल्याने युवा साक्षरता दर यातील उच्च पातळीवरील लिंग भेद (८.२ टक्के पॉईंट्स) हे भारताचे वैशिष्ट्य राहिले आहे. सन २०११ मधे पुरुष और महिला लोकसंख्येत (वय १५ वर्षे व त्यापेक्षा अधिक) प्रौढ साक्षरता दर हा अनुक्रमे ७८.८ टक्के आणि ५९.३ टक्के असल्याने प्रौढ साक्षरता दर यातील उच्च पातळीवरील लिंग भेद (१९.५ टक्के पॉईंट्स) सुद्धा असलेला भारत एक देश आहे. मुली व महिला यांची साक्षरता पातळी वाढवण्याचे अधिक प्रयत्न करायला हवेत हे स्पष्ट आहे.

**प्रणालीची कार्यक्षमता**

जरी शिक्षणाच्या प्राथमिक आणि माध्यमिक टप्प्यात शाळा सोडून देण्याचे प्रमाण घटत असले तरी, मुले बऱ्याच मोठ्या संख्येत पूर्ण करण्यापूर्वी शाळा सोडून देणे हे चालूच आहे.

प्राथमिक शिक्षण सन २०१४-१५ मधे प्राथमिक पातळीवर शाळेत राहण्याचा दर ८३.७ टक्के होता आणि प्रारंभिक पातळीवर तो कमीत कमी ६७.४ टक्के होता. ह्यावरून असे समजते की साधारणपणे इयत्ता १ मधे नोंदणी केली होती त्या दर १० पैकी चार मुलांनी इयत्ता ८ पूर्ण करण्यापूर्वीच शाळा सोडून दिइली होती. माध्यमिक शाळा सोडून देणाऱ्यांचे प्रमाण हे अजूनही अधिकच आहे, विशेषतः सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने मागास गटातील शिकणाऱ्यांमधे हे आढळले. जरी सर्व प्रकारच्या श्रेणीतील विद्यार्थ्यांच्या बाबतीत अर्ध्यातून सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दराबाबत चिंतेचा विषय असला तरी, सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागास वर्ग, विशेषत: या गटातील मुली, यांचा अर्ध्यातून शाळा सोडून जाणाऱ्यांचा दर हा राष्ट्रीय सरासरी पेक्षा अधिक आहे. सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागास परिस्थितीतील समुदायातील मुलांनी शाळेत येत राहणे सुधारण्यासाठी उपाय हाती घेण्याची गरज असल्याचे लक्षात आणले आहे. सर्व नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याची खात्री करणे हे उच्च पातळीवर अग्रक्रमाने करण्याचे काम आ.हे

**प्रशासन व व्यवस्थापन**

अनेक अभ्यासात असे नोंदवले आहे की शिक्षण प्रशासनातील आव्हानात शिक्षकांची अनुपस्थिति, शाळा/ महाविद्यालय/विद्यापीठ यांना दिला जाणाऱ्या फंडात विलंब आणि प्रशासकीय क्षमता या सारखी उदाहरणे दर्शवली आहेत. प्रभावी कार्यक्रम नियोजन आणि अंमलबजावणी संबंधित क्षमतेच्या मर्यादा एक महत्वाची

समस्या राहिली आहे. परिणमतः, नियोजित कार्यक्रमांची अंमलबजावणीची प्रगती एकसारखी होत नाही. प्रशासन आणि शिक्षण प्रणालीचे आणि संस्थांचे व्यवस्थापन, विशेषत: तृतीय शिक्षणाचा टप्प्यात, पुरवठादार, कार्यक्रम, व भांडवल पुरवण्याचे मार्ग यांच्या बहुलतेमुळे जटिल बनले आहे. तसे पाहता हे खरे आहे की काही राज्यांनी उत्साहपूर्ण पुढाकार आणि अभिनव व्यवस्थापन प्रदर्शित केले आहे, परंतु देशातील एकंदर चित्र हे संमिश्र स्वरुपाचे आहे. प्रशासन आणि व्यवस्थापन धोरणे याकडे, प्रणाली तसेच संस्थात्मक अशा दोन्ही पातळीवर, एका नव्या रुपात पाहणे ही तातडीची गरज आहे.

शाळा आणि उच्च शिक्षणाच्या उप-विभागात व्यापारीकरण हे मोठ्या प्रमाणावर होत आहे, जे खासगी शैक्षणिक संस्था आकारणाऱ्या प्रवेश शुल्कात प्रतिबिंबित होत आहे. खालच्या दर्जाच्या शैक्षणिक संस्थांची भाराभार बेसुमार वाढ झाल्याने शिक्षण प्रणालीवरील विश्वासपात्रता घटली आहे.

**संशोधन आणि विकास**

भारतात संशोधन आणि विकास यातील विद्यापीठांचा पुढाकार कमकुवत आहे. विद्यमान प्राध्यापकांमधील कौशल्य अदययावत करण्याचा फक्त मर्यादित पुढाकार झाली घेतला गेला आहे; दोन्हीत सर्वोत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षण आणि संशोधना दरम्यान समन्वय साधणे; संशोधन गुणवत्ता सुधारण्यासाठी उच्च शिक्षण संस्था आणि त्यांचे प्राध्यापकवर्ग यांना जगभरातील संस्था आणि प्राध्यापक यांच्याशी संपर्क करून काम करण्यास प्रोत्साहन व आधार देऊन आंतरराष्ट्रीयकरणाला पुढावा देणे; संशोधनाकरता युती (अलायन्सेस) तयार करणे आणि त्याकरता तशा सोई - सुविधा तयार करणे, आणि विद्यापीठाचे विभागांना संशोधन संस्थांशी व उद्योगांशी जोडणे जेणेकरून ज्ञानविकासाच्या प्रक्रियेला वेग येईल.

**अर्थसंकल्पातील निर्बंध**

शिक्षणाला अपुरे भांडवल पुरवण्या मुळे शिक्षणात प्रवेश करणे वाढवण्यावर व दर्जेदार शिक्षण जोपासण्यावर निर्बंध येत राहिले आहेत. अनेक अभ्यासात असे नोंदवले आहे की शिक्षण प्रशासनातील आव्हानात शिक्षकांची अनुपस्थिति, शाळा/ महाविद्यालय/ विद्यापीठ यांना दिला जाणाऱ्या फंडात विलंब या सारखी उदाहरणे

दर्शवली आहेत. या आधीच्या शैक्षणिक धोरणांनी जीडीपीच्या ६ टक्के हे शिक्षणावरील किमान खर्च अशा नियमाला मान्यता दिली आहे. तथापि, हे लक्ष्य कधीही साध्य केले गेले नाही. शाळा, उच्च व प्रौढ शिक्षण कार्यक्रमांचा विस्तारकरण्याकरता आखणी केलेले कार्यक्रमांची अंमलबजावणी पूर्ण करण्यावर आणि शिक्षणाच्या गुणवत्तेची एक उचित पातळी कायम राखण्यावर निधीचा कमी पुरवठा हा एक मोठा निर्बंध ठरला आहे. याखेरीज कार्यक्रमांची वेळेवर अंमलबजावणी करण्यात व्यापक व निरंतर अपयशामुळे पुरवलेल्या संसाधनाचे उप-इष्टतम वापर झाला.

**जागतिक वचनबद्धता**

जागतिक स्थायी विकास ध्येय ४ (एसडीजी ४) २०३० च्या अंजेन्डा अंतर्गत
'समावेशक आणि समतुल्य गुणवत्तेचे शिक्षण देण्याची सुनिश्चिती करा आणि सर्वांना जीवनभर अध्ययन करण्याची संधी पुरवा.' ईएफए अजेन्डा जो २००० मध्ये सुरु केला गेला तो अजून पूर्ण केला गेला नाही, विशेषकरून युवा व प्रौढ साक्षरांशी, शाळेत न राहणारी मुले, बालपणातले संगोपन व शिक्षण यात कमी प्रवेश, कौशल्य विकासाला अपुऱ्या संधी आणि शिक्षणाची व विद्यार्थ्यांची अध्ययन पातळीची असमाधानकारक गुणवत्ता यासंबंधित पूर्ण केले गेले नाही. म्हणून, एनईपी, अपूर्ण राहिलेले ईएफए अजेन्डा आणि एसडीजी४ शी निगडीत लक्ष्ये या दोन्हींचा पाठपुरावा करेल.

प्रवेश व समतुल्यता यांच्याशी समझौता न करता शिक्षण विकास सर्वसामान्यतः, आणि विशेषतः शिक्षणाचि गुणवत्ता यांना उत्तेजन देण्याचे अभिनव दृष्टीकोन व निरंतर प्रयत्न याची शैक्षणिक विभागाला सामोरे जावे लागणाऱ्या आव्हानांना आवश्यकता आहे. मुख्य आव्हान हे परिणामकारक कार्यनीति (स्ट्रॅटिजी) तयार करणे जी भारतातील शैक्षणिक वृद्धीच्या वैविध्यपूर्ण आव्हानांना संबोधित करेल आणि देशाच्या 'जनसांख्यिकीय लाभांश' याची क्षमता ओळखेल.

## प्रकरण -३

## व्हिजन, मिशन, ध्येये आणि उद्दिष्टे

### व्हिजन

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP), 2016 हे अशा एका विश्वसनीय आणि उच्च कामगिरी करणाऱ्या शिक्षण प्रणालीची कल्पना करत आहे जे समावेशक दर्जेदार शिक्षण खात्रीने देण्याची आणि सर्वांना जीवनभर शिकण्याची संधी उपलब्ध करण्याची क्षमता बाळगत असेल आणि जे सृजनशील जीवन जगण्यास, देशाच्या विकासाच्या घडणीत कार्यभार उचलतील, शीघ्र गतीने बदलणाऱ्या ,निरंतर वैश्विकतेकडे झेपावणारे, ज्ञानाधारित अर्थव्यवस्था व समाज यांच्या गरजांना प्रतिसाद देण्यास आवश्यक अशा ज्ञान, कौशल्य, प्रवृत्ती व मूल्यांनी सुसज्ज अशा विद्यार्थी / स्नातकांना निर्माण करेल .

### मिशन

- सर्वांकरता समान, समावेशक, दर्जेदार शिक्षण, सर्वांना - मुले, तरुण, व प्रौढ लोक- जीवनभर शिकण्याची संधी उपलब्ध करण्याची खात्री देणे आणि राष्ट्राच्या मानवी क्षमतेला त्याच्या पूर्णांशाने समतुल्यता व उत्कृष्टतेने प्रत्यक्षात उतरवण्यास बढावा देणे याची खात्री देणे.

- शालेय आणि उच्च शिक्षण तसेच प्रौढ शिक्षण कार्यक्रम हे भारताचा समृद्ध वारसा, वैभवशाली भूतकाल, महान परंपरा आणि बहु-जिनसी संस्कृती याची लहान मुले, तरुण आणि प्रौढांमध्ये जागरूकता बाणवतात याशिवाय जबाबदार नागरिकत्व, शांतता, सहिष्णुता, निधर्मीपणाच्या, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक संयोग आणि सर्व धर्मांविषयी परस्पर आदर ह्यांना प्रोत्साहन देणारी ही मूल्ये तसेच जागतिक नागरिकत्व आणि शाश्वत प्रगती ह्यांना विकसित करण्यास मदत करणारी सार्वत्रिक मूल्ये विद्यार्थी सर्व स्तरांवर अंगी बाणवत आहेत याला प्रोत्साहन दिले जात आहे; याची खात्री करणे;

- सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व स्तरांवर अध्ययनाच्या निर्दिष्ट निष्पत्तींची (ज्ञान, कौशल्य, प्रवृत्ती आणि मूल्ये) ज्याची सृजनशील जीवन जगण्यास, देशाच्या विकासाच्या घडणीत कार्यभार उचलण्यास, आणि उभरणाऱ्या वैश्विक आवाहनांना तोंड देण्यास आवश्यकता आहे, प्राप्ति करता यावी यासाठी अभ्यासक्रम, अध्ययनाची सामुग्री, शैक्षणिक प्रक्रिया, अध्ययनाचे मूल्यांकन, अध्यापकाची गुणवत्ता आणि काम, आणि संस्थात्मक नेतृत्व आणि व्यवस्थापन याच्यांशी संबंधित सुधारणांवर लक्ष केंद्रित करून दर्जेदार शिक्षणाला जोपासणे.

- सर्व विद्यार्थ्यांना त्यात्या कौशल्यांना, कामासाठी व उद्योजकतेसाठी तसेच कौशल्ये आणि कार्यक्षमता जे पोपटपंची करून शिकण्याची जागा घेईल आणि त्यांना अदिक सूजनशील व

कल्पक होण्यास, निर्णायकरीत्या विचार करण्यास, प्रभावीपणे संवाद साधण्यास, स्वतंत्रपणे समस्या सोडवण्यास, आणि राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियांमध्ये योगदान देऊ शकण्यास वाव देईल , ज्यात तांत्रिक व व्यावसायिक कौशल्याचा समावेश आहे, संपादित करण्यास प्रोत्साहित करणे.

**ध्येये आणि उद्दिष्टे**

एकंदर ध्येय हे शिक्षणाची गुणवत्ता आणि प्रसंगोचितता जोपासणे आणि भारतीय शिक्षण प्रणालीची विश्वासपात्रता वाढवणे, शाळेच्या व उच्च शिक्षण प्रणालीच्या उत्पादनाची (विद्यार्थ्यांची) व्यवसायाभिमुखता सुधारणे, बालपणातील शिक्षणा पासून ते तृतीयक शिक्षणापर्यंत ज्यात तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचाही समावेश आहे, शिक्षणात आणि प्रशिक्षण (टीव्हीइटी) तसेच जीवनभर शिकण्याची संधी यात समान प्रवेशाची खात्री करणे, आणि समाजातील सर्व वर्गांना शैक्षणिक संधी उपलब्ध होतील याची खात्री करा.

व्हिजन आणि मिशन यांना पूर्ण साध्य करणे हेच शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

- लोकसंख्येच्या वंचित गटातील मुलांकडे विशेष लक्ष देउन पूर्व-शालेय(बालवाडी) वयाची सर्व मुले वय ४-५ वर्षे शिक्षण प्राप्त करून घेत आहेत आणि प्राथमिक शिक्षणात हळुवारपणे सहज संक्रमण करण्यासाठीचे विकासात्मक तयारी प्राप्त करत आहेत याची खात्री करण्याकरता बालपणीच्या शिक्षण सेवांचा विस्तार करणे;

- सार्वभौमिक प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण प्राप्त करणे आणि सर्व माध्यमिक शिक्षण स्नातकांना उच्च माध्यमिक शिक्षणात प्रवेश आहे आणि सर्व उच्च माध्यमिक शिक्षण स्नातकांना उच्च शिक्षणात समान प्रवेश आहे आणि सर्व नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना यशस्वीरित्या त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यास आधार मिळाला आहे व सर्वांनी अपेक्षित अध्ययनाची निष्पत्ती प्राप्त केली आहे याची सुनिश्चितता करणे;

- सर्व शैक्षणिक कार्यक्रमांना मुलांच्या विविध गटांच्या व तरूण लोकांच्या गरजांनुसार सुगम, समावेशक व प्रतिसादात्मक केल्याची खात्री करणे, ज्यात वंचित लोकसंख्येच्या वंचित वर्गावर विशेष लक्ष केंद्रित करून, खास करून विशेष गरजा असलेले व विविध प्रकारच्या विकलांगता असलेले मुले, किशोरवयाचे आणि तरूण आणि सर्व नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी अपेक्षित अध्ययनाची निष्पत्ती प्राप्त करण्याकरता समर्थन दिले गेले आहे याची सुनिश्चितता करणे;

- सम्पूर्ण शैक्षणिक प्रणालीत शिक्षणातील सामाजिक, प्रादेशिक व लैंगिक भेद नष्ट केले आहेत आणि लैंगिक समभाव आणि मुलींच्या व महिलांच्या एम्पॉवरमेंटला उत्तेजन दिले गेले आहे याची सुनिश्चितता करणे;

- कौशल्य विकासाकरता संधीचा विस्तार करणे, जीवन व कामाकरता कौशल्ये व क्षमता यांचे तरूण व प्रौढ लोकांनी संपादन करणे, यात तांत्रिक, व्यावसायिक कौशल्याचाही समावेश होतो, ज्यांची व्यवसायाभिमुख होण्यास, नोकरी व उद्योजकता आणि कामाच्या नित्य-बदलत्या विश्वात जुळवून घेण्याकरता गरज असते;

- युवा लोक (१५-२४ वर्षांचे) व प्रौढ (१५ वर्षे व त्याहून अधिक) जे औपचारिक शिक्षण प्रणालीच्या बाहेर आहेत, यात अर्थव्यवस्थेच्या अनौपचारिक विभागातही काम करत आहेत त्यांचाही समावेश आहे, त्यांना व्यवसायाभिमुखतेसाठी लागणाऱ्या कौशल्यांना प्राप्त करण्याची संधी पुरवल्या गेल्या आहेत;

- उच्च शिक्षण प्रणालीला नवनिर्माण करा जेणेकरून तृतीयक शिक्षणात, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासह, समान प्रवेशाची खात्री करा, गटांमधील उच्च शिक्षणातील प्रवेशातील असमानता कमी करा, आणि अध्यापना व संशोधन यात सुधारणा करा, अभिनवतेला उत्तेजन द्या व सर्व उच्च शिक्षणाच्या संस्थामधे नवीन ज्ञानाची निर्मिती करा आणि सर्व नोंदणी केलेल्यांना निर्दिष्ट अध्ययनातील निष्पत्ती व व्यवसायाभिमुख कौशल्ये प्राप्त करण्यास सक्षम बनवा;

- माहिती व संपर्क तंत्रज्ञान (आयसीटी ICT) याला शिक्षणात समन्वित केल्याची खात्री करा, खास करून शिक्षणात प्रवेश सुधारण्यासाठी, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेची, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी, आणि शैक्षणिक नियोजन व व्यवस्थापन यांना बळकटी आणण्यासाठी करावे.

- शिक्षक विकास व व्यवस्थापन याची प्रणाली, ज्यात शिक्षकाच्या व्यावसायिक विकासाला चालू ठेवणे समाविष्ट आहे, यांचे नवनिर्माण केले जात आहे याची खात्री करणे, जेणेकरून पात्र व सक्षम शिक्षकांचा, ज्यांच्याकडे शिक्षकांसाठी विहित (प्रिस्क्राईब) क्षमता प्रोफाईल व विहित व्यावसायिक प्रमाणितता आहे, पुरेसा पुरवठा होत आहे याची खात्री केली जाते;

- सर्व युवा व किमान ९०% प्रौढ, पुरुष व स्त्रिया दोन्हीही, साक्षरता व संख्याविषयक कौशल्ये प्राप्त करतील जे प्रौढ शिक्षण कार्यक्रमाने विहित केलेली आहेत, याची सुनिश्चिती करणे;

- एक प्रतिसाद देणाऱ्या सहभागी आणि शैक्षणिक नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन याच्या उत्तरदायी प्रणालीचे सांस्थीकरण करणे, आणि शैक्षणिक नियोजन व व्यवस्थापन प्रथांच्या संरचना करताच्या शैक्षणिक विभागाचे नियोजन व व्यवस्थापन हे राष्ट्रीय, उप-राष्ट्रीय, व

स्थानिक पातळीवर सुधारले आहे आणि विस्तार पावणाऱ्या शैक्षणिक विभागाच्या नवीन नवीन उदयाला येणाऱ्या शैक्षणिक प्राधान्यांना व मागण्यांना अधिक प्रतिसादात्मक बनवले गेले आहे याची खात्री करणे;

- व्यवसायीकरण आणि संस्थात्मक नेतृत्वाची सक्षमता, आणि शैक्षणिक विभागातील नेतृत्व हे विस्तार पावणाऱ्या शैक्षणिक विभागाच्या नवीन नवीन उदयाला येणाऱ्या शैक्षणिक प्राधान्यांना व मागण्यांना अधिक प्रतिसाद देण्याकरता राष्ट्रीय, उप-राष्ट्रीय, व स्थानिक पातळीवर सुधारले आहे याची खात्री करणे;

- शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमांसाठी अधिक व उचित-लक्षाकरता निधी पुरवठा होत असल्याची खात्री करणे.

भावी शैक्षणिक अजेन्डाची दिशा ही आजीवन व विभागाच्या व्यापक दृष्टीकोनाच्या मजबूत आधारावर अवलंबून आहे. शिक्षणाची व्याप्ति अधिक विस्तृत करण्यासाठी शिकणाऱ्याची निवड व क्षमता यानुसार व कामाच्या विश्वात आवश्यक असणाऱ्या कौशल्यांशी सुसंगत अध्ययनाच्या अनेक मार्गांना सुकर करण्यासाठी धोरणाची परिकल्पना केली आहे, ते करताना औपचारिक व अनौपचारिक अध्ययनाच्या रीति-पद्धतीद्वारे, ज्यात मुक्त व दूरस्थ अध्ययनाच्या प्रकाराचा समावेश आहे, शिकणाऱ्याच्या अध्ययनाच्या निष्पत्तीला मान्यता दिल्याची व प्रमाणीकरण केल्याची खात्री केली पाहिजे.

## प्रकरण ४

## धोरणाचा आराखडा

पुढील विभागांत आम्ही प्रत्यक्ष कृतीतून साकार करणार असलेली धोरणे, ध्येय आणि आव्हाने थोडक्यात दिली आहेत. त्यातील बरीचशी सध्या आणि अनेक वर्षे कार्यान्वित आहेत, काही तर अनेक दशके चालू आहेत. आपल्या शिक्षण क्षेत्राचा प्रचंड आवाका आणि विविध राज्यातील अंतर्गत उपपद्धतींचे वैविध्य लक्षात घेतले पाहिजे. बदल आणण्याच्या प्रयत्नासाठी प्रवेश, समावेश आणि उत्तमता याविषयीच्या आव्हानांचा सामना करण्याचे एकमेव उत्तर किंवा उपाय नाही. प्रवेशाचा आवाका आणि समावेश वाढवण्यासाठी जे प्रयत्न चालू आहेत त्यांचे फायदे पाहता शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे हा धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. रोजगारक्षमता ही फार महत्त्वाची गोष्ट असल्यामुळे तिच्याकडे योग्य लक्ष दिले आहे. विविध ध्येये साध्य करण्यासाठी जागतिक परिवर्तने आणि तांत्रिक प्रगती लक्षात घेऊन नवीन क्षेत्रांची ओळख करून दिली आहे.

एक कृती आराखडा आखला जाईल व त्यामध्ये केन्द्रीय, राज्य/केन्द्रशासित प्रदेश व स्थानिक पातळ्यांवरील दर्शवलेल्या प्रदेशात अंमलबजावणीची धोरणे दर्शवली जातील. विशेषतः राज्य व स्थानिक शासनांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०१६ शी सुसंगत अशी त्यांची स्वतःची धोरणे किंवा कृतियोजना आखण्यासाठी उत्तेजन दिले जाईल.

या प्रत्येकामध्ये करण्याच्या कृती व महत्त्वाची क्षेत्रे खालील विभागांत दर्शवली आहेत. अर्थातच, ही परिपूर्ण नाहीत आणि यामध्ये नंतर अनेक कृतींचा समावेश होऊ शकतो.

### ४. १ शाळापूर्व शिक्षण

शाळापूर्व शिक्षणाकडे आतापर्यंत आवश्यक ते लक्ष दिले गेले नव्हते, कारण सरकारी शाळांत पूर्वप्राथमिक शिक्षण दिले जात नव्हते. महिला आणि बाल कल्याण खात्याच्या एकात्मिक बालक विकास सेवा कार्यक्रमामध्ये बालपणाच्या प्रारंभीच्या काळातील शिक्षणाची सोय आहे. जगभरात हे मान्यच झालेले आहे की बालपणातली पहिली वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात, कारण तेव्हा मुलांच्या मानसिक व शारीरिक विकासाची पातळी सर्वोच्च असते.

खालील धोरणानुसार कार्यक्रमांची सुरवात केली जाईल.

१. प्राधान्याने, ४ ते ५ या वयोगटातील बालकांसाठी महिला आणि बाल विकास खात्याच्या समन्वयाने शाळापूर्व शिक्षणाचा कार्यक्रम राबवला जाईल.
२. सध्या, आय सी डी एसच्या अंतर्गत असलेल्या अंगणवाड्यांकडे शाळापूर्व शिक्षण देण्याच्या दृष्टीने पुरेशा सुविधा नाहीत. अंगणवाड्यांमधील शाळापूर्व शिक्षण सुयोग्य होण्यासाठी राज्यांशी चर्चा करून अभ्यासक्रम आखणे व शैक्षणिक साधनांचा विकास करणे, तसेच, अंगणवाड्यांमधील सेवकांना प्रशिक्षण देणे, यासाठी एका वर्षात पावले उचलली जातील.

३. राज्य शासने पूर्व प्राथमिक शिक्षकांसाठी केडर तयार करतील आणि त्यांच्या सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा तयार करतील. अंगणवाड्यांकडून पूर्व प्राथमिक शाळांकडे संक्रमण क्रमाने व सुलभतेने होईल आणि त्याच्या कालावधीची चौकट ठरवणे राज्यांच्या हातात असेल.
४. योग्य कालावधीत सर्व प्राथमिक शाळांमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण उपलब्ध होईल. यासाठी, सर्व अंगणवाड्या शाळांच्या आवारात किंवा शक्य तितक्या त्यांच्याजवळ ठेवण्याचे प्रयत्न केले जातील.
५. खाजगी पूर्व प्राथमिक शाळांसाठी उचित नियमनाचे व सततच्या निरीक्षणाचे उपयुक्त नियम व यंत्रणा तयार केल्या जातील.

**४.२ बालकाच्या हक्कांचे संरक्षण व किशोर शिक्षण**

१. बालकाच्या हक्कांचे संरक्षण ही त्यांच्या वैयक्तिक सुरक्षेच्या पलीकडची गोष्ट आहे आणि त्यामध्ये शारीरिक शिक्षा नसणे, भावनिक व शारीरिक छळ नसणे, शाळेतल्या कृतींमध्ये इजा होऊ नये म्हणून सावधानता असणे, मूलभूत सुविधा सुरक्षित असणे, भाषेचा वापर आणि कृतींमध्ये बालकांना स्नेह देण्याची जाणीव असणे, भेदाभेद नसणे, शारीरिक पीडा, नासधूस व छळ नसणे या सर्व बाबींचा समावेश होतो. बालकाच्या हक्कांच्याबद्दल योग्य असे संवेदनशील व स्वागतशील वातावरण निर्माण करण्यावरही त्यात भर असेल. बालकाच्या हक्कांना किंचितही धक्का पोचणे सहन केले जाणार नाही, अशा प्रकारे त्यांच्या शारीरिक व भावनिक सुरक्षेची काळजी घेतली जाईल.
२. त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:
१. शालेय सुरक्षा आणि मुलांची जपणूक यांच्या खात्रीसाठी एक आराखडा व मार्गदर्शक तत्त्वे विकसित केली जातील व शालेय शिक्षण संस्थांच्या मान्यता व नोंदणीच्या पात्रतेच्या अटींमध्ये त्यांचा समावेश केला जाईल.
२. बालकाच्या हक्कांशी संबंधित व सुसंगत कायदे, नियम, निर्बंध व त्यांचे उल्लंघन कसे होते, यांच्या तरतुदींविषयी प्रत्येक प्राचार्य व शिक्षकाला जाणीव दिली जाईल व त्यासंबंधीच्या मापदंडांचा शिक्षकांच्या शिक्षणात/प्रशिक्षणाच्या कार्यक्रमांत आणि रिफ्रेशर कोर्समध्ये समावेश केला जाईल.
३. किशोर शिक्षण कार्यक्रम व राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम यांचा शाळांच्या अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने अंतर्भाव केला जाईल.
४. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या सेवापूर्व आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात किशोर शिक्षणाचा समावेश केला जाईल.
५. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्या उपयोगासाठी बालकाच्या हक्कांशी संबंधित स्वयंशिक्षण ऑनलाइन कार्यक्रम तयार केले जातील.
६. वाढत्या वयाच्या मुलग्यांना किशोरवयाच्या ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते, त्याविषयी पालकांना व शिक्षकांना खाजगी रीतीने सल्ला देण्यासाठी शाळा प्रशिक्षित समुपदेशकांना नियुक्त करतील. काळ

**४.३ शालेय शिक्षणाची फलनिष्पत्ती -**

प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये शिक्षणाचा निकृष्ट दर्जा ही गोष्ट सातत्याने एक चिंतेचा विषय होऊन राहिली आहे. आढाव्यांमधून दिसत आहे की मुले शाळेमध्ये वाचन, लेखन व अंकगणिताची मूलभूत कौशल्ये शिकत नाही आहेत. राज्यांनी या बाबतीत शिक्षणाच्या निष्पत्तीची व्याख्या व मापन करणे व वाचन, लेखन, आकलन व गणिताच्या शिक्षणासाठी प्रशिक्षण कार्यक्रम अधिक परिणामकारक करणे वगैरे पावले उचलली आहेत. हे सर्व प्रयत्न करूनही, शिक्षणाचा निकृष्ट दर्जा हे अजूनही आव्हानच राहिले आहे. म्हणून, शालेय मुलांच्या शिक्षणाचा निकृष्ट दर्जा सुधारण्यासाठी केन्द्र व राज्य शासने प्राधान्य देत आहेत, त्यातून प्राथमिक शालेय मुलांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावेल.

त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:

१. शिक्षणाधिकार कायद्यामध्ये नमूद केलेल्या मूलभूत सुविधाविषयक तरतुदींमध्ये भर घालून शिक्षणाच्या निष्पत्तीबद्दलची सूत्रे विकसित केली जातील आणि ती खाजगी च सरकारी दोन्ही शाळांना सनानतेने लागू केली जातील.

२. शिक्षणाधिकार कायद्यामध्ये नमूद असलेल्या मापदंडांमध्ये राज्यसरकारे स्थानिक परिस्थितीनुसार मूलभूत सुविधाविषयक आराखडे व योजना करताना लवचिकता वापरू शकतील. स्थानिक परिस्थितीनुसार स्थानिक सूत्रे उत्क्रांत केली जातील, गरज पडल्यास, शिक्षणाधिकार कायद्यामध्ये दुरुस्ती करता येईल. यातून, अगदी वंचित आणि स्थलांतरित मुलांच्या विशिष्ट वर्गांसाठी, आणि कठीण परिस्थितीत जगणाऱ्या मुलांसाठी 'पर्यायी शाळा' काढून शैक्षणिक माध्यमाची व्यवस्था करता येईल.

३. सध्याची 'नो-डिटेन्शन' धोरणाची तरतूद दुरुस्त केली जाईल, कारण तिच्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कामगिरीवर गंभीर दुष्परिणाम झाले आहेत. 'नो-डिटेन्शन' धोरण पाचव्या इयत्तेपर्यंत मर्यादित राहील आणि 'डिटेन्शन' व्यवस्था उच्च प्राथमिक पातळीवर पुन्हा आणली जाईल. शाळांमध्ये घेतल्या जाणाऱ्या सी सी ईद्वारा बौद्धिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थी निवडून त्यांना सुधारात्मक शिक्षण दिले जाईल.

४. शाळांमध्ये अध्यापनाचा दर्जा सुधारण्यासाठी परिणामकारक पावले उचलली जातील, मुलांना विशेष बौद्धिक मदत देऊन आधार देण्यासाठी व ई-रिसोर्सेससह ज्ञानाच्या बहुविध स्रोतांमध्ये त्यांना प्रवेश मिळण्यासाठी यंत्रणा निर्माण केली जाईल.

**४.४ शालेय शिक्षण**

सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण (यू ई ई) वास्तवात आल्यामुळे, माध्यमिक शिक्षण अपरिहार्य आहे. यासाठी, त्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी, संस्थेचे ठिकाण व व्यवस्थापन कोणतेही असो, विवक्षित दर्जाच्या माध्यमिक शालेय व्यवस्थेच्या विकासाची आवश्यकता आहे. माध्यमिक पातळ्यांवर विद्यार्थ्यांच्या टिकून राहण्याचे आणि **संक्रमणाचे** प्रमाण सुधारणे हे आव्हान आहे. सध्याची परीक्षा व्यवस्थाही अनेक दोष व

गैरव्यवहारांनी ग्रासलेली आहे. काही राज्यांत न्याय्य आणि पारदर्शी पद्धतीने परीक्षा घेण्याचे प्रयत्न केले गेले असले तरी एकूण परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:

१. कमी प्रवेश आणि अपुऱ्या मूलभूत सुविधा असलेल्या शाळा ओळखण्यासाठी प्रत्येक राज्य शाळांच्या प्रतिचित्रणाचा तपशीलवार प्रयोग करेल. जिथे शक्य असेल तिथे, सध्या अव्यवहार्य असलेल्या शाळांचे रूपांतर संयुक्त शाळांमध्ये करून मानवी, भौतिक आणि मूलभूत सुविधांचा अधिकाधिक उपयोग, अधिक चांगली बौद्धिक कामगिरी आणि कमी खर्चाचे व्यवस्थापन साध्य करण्याचे प्रयत्न केले जातील. अशा रीतीने शाळा एकत्र केल्या तर त्या एकाच आवारात नेता येतील. राज्यांशी चर्चा करून, शिक्षणाधिकार कायद्याला धक्का न लावता, विलीनीकरण व एकत्रीकरणासाठी समान मार्गदर्शक तत्त्वे उत्क्रांत करता येतील. अशा एकत्रीकरणातून देशाला एक वर्ग-एक शिक्षक' हे सूत्र नजीकच्या भविष्यकाळात साध्य करता येईल.

२. शासनाचे अनुदान घेणाऱ्या अल्पसंख्यांच्या (धार्मिक व भाषिक) संस्थांना शाळा शिक्षणाधिकार कायद्याचे कलम १२ (१) (सी) **विस्तारून लागू** करण्याच्या विषयाचे परीक्षण आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांबद्दलच्या विस्तृत राष्ट्रीय बांधिलकीचा विचार करण्याच्या दृष्टीने केले जाईल.

३. माध्यमिक पातळीच्या शिक्षणाला सामावण्यासाठी शिक्षणाधिकार कायद्याची व्याप्ती योग्य वयापर्यंत वाढवण्यासाठी शासन प्रयत्न करेल.

४. सर्व पातळ्यांवरील शालेय शिक्षणामध्ये सुविधा व विद्यार्थी निष्पत्ती यांच्या तरतुदींसाठी किमान प्रमाणके लागू केली जातील.

५. जिथे शक्य असेल तिथे, माध्यमिक पातळीपर्यंत, सापेक्षतः शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या प्रदेशांना प्राधान्य देऊन, केन्द्रीय विद्यालये (केव्ही) व जवाहर नवोदय विद्यालये (जेएव्ही) यांचा विस्तार केला जाईल व कस्तुरबा बालिका विद्यालयांचा विस्तार व दर्जासुधारणा केली जाईल. जवाहर नवोदय विद्यालये (जेएनव्ही) यांच्या यशाच्या कारणांचा अभ्यास केला जाईल व राज्यांमध्ये त्यांचे अनुकरण केले जाईल.

६. शाळा सोडणाऱ्यांना आणि काम करून शिकणाऱ्यांना पूर्ण वेळ औपचारिक शाळेत न जाता शिक्षण घेता यावे म्हणून खुल्या शाळेच्या सुविधांचा विस्तार केला जाईल.

७. अनेकदा आपले कौशल्य व आवडी यांनुसार योग्य अकादेमिक निवड करताना विद्यार्थ्यांचा गोंधळ उडतो, त्यामुळे त्यांना आपली खरी क्षमता कळत नाही आणि अपयश, निराशा आणि तणाव यांचा सामना करावा लागतो. विद्यार्थ्यांना आपली खरी क्षमता व आवडीचे विषय कळण्याला मदत म्हणून विविध पातळ्यांवर अकादेमिक कौशल्य चाचण्या घेतल्या जातील. हेल्पलाइन उपलब्ध केली जाईल. शाळांमध्ये व्यावसायिक समुपदेशक नियुक्त होतील व ते

विद्यार्थ्यांना क्षमतेच्या बाबतीत मदत करतील, विशेष अध्ययन गरज असलेल्या मुलांना ओळखतील, मंदगती विद्यार्थ्यांना आणि कमी गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना मदत करतील. व्यावसायिक कौशल्याधारित कार्यक्रमांसह इतर कोर्सच्या निवडीसाठी ते मदत करतील आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांना योग्य नोकरीच्या संधींच्या दृष्टीनेही मार्गदर्शन करतील.

**४.५ अभ्यासक्रम नवीकरण आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा**

स्वामी विवेकानंद म्हणाले होते, "शिक्षण म्हणजे तो माहितीचा गठ्ठा नव्हे जो आम्ही तुमच्या मेंदूत भरतो आणि मग तो जन्मभर न पचल्यामुळे गोंधळ करत राहतो. आपल्याला जीवनाला आकार देणारे, माणूस तयार करणारे आणि चारित्र्य घडवणारे कल्पनांचे सम्मीलन हवे आहे. तुम्ही जर केवळ पाच कल्पनांचे सम्मीलन केले असेल आणि त्यातून तुमचे जीवन व चारित्र्य घडवले असेल, तर तुमचे शिक्षण एखाद्या पूर्ण ग्रंथालय पाठ करणाऱ्या माणसापेक्षा मोठे आहे. शिक्षण म्हणजे जर माहितीच असेल, तर ग्रंथालये ही जगातले सर्वात मोठे साधू ठरतील आणि ज्ञानकोश हे महान ऋषी." विवेकानंदांच्या विधानाला इंटरनेटच्या आगमनाने आणि सतत विस्तारणाऱ्या डिजिटल कनेक्टिव्हिटीमुळे अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे, कारण आज आपण ग्रंथालयात जात सुद्धा नाही आणि एक बटन क्लिक करून माहिती मिळवतो. त्यामुळे माहिती-आधारित शिक्षणापेक्षा मूल्य-आधारित शिक्षणव्यवस्थेकडे जाण्याची गरज आहे, तेच आपल्याला माणूस आणि राष्ट्र घडवणारी जीवन कौशल्ये देऊ शकते.

नव्याने उदयाला येणाऱ्या अध्ययन क्षेत्रावर विशेष भर देऊन सर्व पातळ्यांवरच्या शिक्षणाच्या अभ्यासक्रमांचे नवीकरण होण्याची आज गरज आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाला आणि तसेच या उदयाला येणाऱ्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्था व समाजाच्या मागण्यांना प्रतिसाद देण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याच्या दृष्टीने काही भागावर भर द्यायला हवा. विद्यार्थ्यांच्या विविध गटांच्या शिकण्याच्या गरजा पूर्ण करायला हव्यात, शिक्षणाची सांगड जीवन कौशल्यांशी व कामाच्या जगाशी घालायला हवी, सातत्यपूर्ण विकासाबद्दल आस्था निर्माण करायल हवी. अधिक लवचिकता आणि व्यक्तिगत लक्ष देण्याकडे झुकणाऱ्या शैक्षणिक व्यवस्थेला प्रतिसाद द्यायला हवा. उच्च कामगिरी असलेल्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक व्यवस्थेमध्ये होणाऱ्या विद्यार्थी अध्ययन निष्पत्तीशी तुल्यबल अशा अध्ययन निष्पत्तीमध्ये प्रावीण्य मिळवण्याच्या संधी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांतून मिळायला हव्यात. अभ्यासक्रमांमधून शैक्षणिक कामगिरीचे व अध्ययन निष्पत्तीचे मापदंड ठरवले जावेत, त्यातून शिक्षणाची उद्दिष्टे साकार होतील आणि त्यांचे साफल्य अभ्यासक्रम सुधारण्याच्या व प्रगत करण्याच्या दृष्टीने सतत तपासता/बारकाईने पाहता येईल.

शिक्षणाची निष्पत्ती सुधारण्याच्या संदर्भात विद्यार्थ्यांनी शिकलेल्या गोष्टींचा आढावा घेणे महत्त्वाचे आहे. व्यवस्थेमध्ये फॉर्मेटिव्ह व सारांशात्मक परीक्षण, सत्रांत परीक्षा, वार्षिक परीक्षा, तसेच अकरावी, बारावी परीक्षा

आहेतच. पण, शालेय पातळीवर परीक्षणाच्या पद्धती समाधानकारक नाहीत. बऱ्याच वेळा विद्यार्थ्यांची पुस्तकातला मजकूर पुन्हा मांडण्याची क्षमता कशी आहे, याचीच फक्त परीक्षा घेतली जाते. पूर्ण परीक्षा पद्धतीचीच पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे म्हणजे विद्यार्थ्यांच्या अनेक वर्षांच्या अभ्यासक्रमातील व अभ्यासेतर क्षेत्रातील आकलनाची सर्वसमावेशक परीक्षा घेतली जाऊ शकेल.

त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:

१. उगवत्या आकांक्षांच्या अनुरोधाने आणि सामाजिक ऐक्य, धार्मिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता या आपल्या देशाच्या ध्येयांना अनुरूप अशा रीतीने अभ्यासक्रमात सुधारणा केल्या जातील. अभ्यासक्रम निष्पत्तीच्या निकषावर आधारित असावा आणि त्याचे उद्दिष्ट असे असावे की ज्यात तंत्रज्ञान वाढते आहे अशा पर्यावरणात जीवनकौशल्ये शिकवण्यातून विद्यार्थ्यांचा परिपूर्ण विकास व्हावा. सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत कर्तव्ये आणि अधिकार दोन्ही शिकवले जातील, त्यामुळे ते आपल्या देशात आणि जगात दोन्हीकडे जबाबदार नागरिकाप्रमाणे वागू शकतील.

२. शालेय शिक्षणाच्या ढासळत्या दर्जाची समस्या हाताळण्यासाठी आणि मधून मधून अभ्यासक्रमाचे व अध्यापनशास्त्राचे नवीकरण करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे पुन्हा समायोजन केले जाईल, त्यातून चाकोरीबद्ध शिक्षणापासून सुटका होईल व सुकर आकलन घडेल व चिकित्सक दृष्टिकोनाला उत्तेजन मिळेल.

३. विज्ञान, गणित व इंग्रजी या विषयांसाठी एक सामाइक राष्ट्रीय अभ्यासक्रम तयार केला जाईल. सामाजिक शास्त्रांसारख्या इतर विषयांसाठी अभ्यासक्रमाचा एक भाग संपूर्ण देशात समान असेल आणि बाकीच्या विषयांच्या बाबतीत राज्यांनी स्वतः विचार करून निर्णय घ्यावेत.

४. पाचव्या इयत्तेपासून पुढे अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने डिजिटल साक्षरतेची ओळख करून दिली जाईल. मात्र, आय सी टी हा विषय म्हणून सहाव्या इयत्तेपासून सुरू होईल. सर्व पातळ्यांवरचे आय सी टी अभ्यासक्रमलागू करण्याच्या दृष्टीने पुनर्विचार करून सुधारले जातील.

५. विज्ञानातील संकल्पना विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके व प्रयोगशाळेतील प्रयोग यांतूनच उत्तम रीतीने समजतात, हे सर्वमान्यच आहे. म्हणून विज्ञान विषय शिकवण्यासाठी सहाव्या इयत्तेपासून क्रमाने प्रात्यक्षिके या घटकाची योजना केली जाईल.

६. लिंगभेद, तसेच, सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक भेदांच्या विषयांची व समस्यांची हाताळणी अभ्यासक्रमात व त्याच्या अंमलबजावणीत विविधतेत एकता या तत्त्वावर भर देऊन योग्य रीतीने केली जाईल. अभ्यासक्रमात सामाजिक विषमता टाळण्यासाठी सामाजिक न्याय व कायदेशीर उपाय हे विषयही हाताळले जातील. पाठ्यपुस्तकात सामंजस्याचा पुरस्कार असेल आणि लिंग, अपंगता, जात, धर्म वगैरे गोष्टींच्या संदर्भात कोणतेही भेदाभेद करणारे/दाखवणारे विषय/प्रसंग/उदाहरणे असणार नाहीत, याची अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांचा विकास करणारे आयोजक/व्यक्ती खात्री करून घेतील. सर्व विषयांच्या क्षेत्रातून नागरिकत्वाचे शिक्षण, शांतीचे

शिक्षण, चारित्र्य संवर्धन, कायद्याची व संविधानाची साक्षरता, आर्थिक साक्षरता, पर्यावरणीय चिरंतनता आणि इतर असे सर्वसाधारण गाभ्याचे विषय यांचा पुरस्कार केला जाईल.

७. परीक्षा अशा आखल्या जातील की त्यामध्ये केवळ पाठ्यपुस्तकातील मजकूर तसाचा तसा लिहिण्याच्या कौशल्याची चाचणी नसेल, तर विशाल जाणीव, समज आणि आकलन आणि उच्च दर्जाची समस्या सोडवण्याची कौशल्ये यांची चाचणी घेतली जाईल. निरंतर मूल्यांकन, प्रश्नपत्रिका तयार करण्याचे मापदंड, मूल्यमापनाच्या निकषांमध्ये पारदर्शकता वगैरे काही पावले या दिशेने टाकता येतील. लवचिकता आणण्यासाठी आणि वार्षिक परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी सरकार मागणीनुसार बोर्डाची परीक्षा हे तत्त्व आणण्याचा प्रयत्न करेल.

८. दहावीच्या परीक्षेतील अपयशाच्या मोठ्या प्रमाणाचे एक महत्त्वाचे कारण सांगितले जाते ते म्हणजे गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयातील असमाधानकारक कामगिरी. नापासांचे प्रमाण कमी करण्यासाठी, गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयातील दहावीची परीक्षा दोन पातळ्यांवर घेतली जाईल : भाग १ - उच्च पातळी व भाग २ - कनिष्ठ पातळी. ज्या कोर्ससाठी गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयांची पूर्व-अट नसेल, असा कोर्स घेण्याची ज्यांची इच्छा असेल, किंवा दहावीनंतर ज्यांना व्यावसायिक कोर्सकडे जायचे असेल, त्यांना भाग २ - कनिष्ठ पातळीची परीक्षा देता येईल.

९. सध्या केन्द्रीय आणि राज्य शिक्षण मंडळे दहावी व बारावीच्या परीक्षा घेतात. विद्यार्थ्यांची शाळा ज्या बोर्डाला संलग्न असेल, त्या बोर्डाचीच दहावीची परीक्षा देणे त्यांना बंधनकारक असेल. दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी दहावी इयत्तेचा संपूर्ण अभ्यासक्रम नेमलेला असेल.

१०. अध्ययनाच्या वेगळ्या पातळ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वेगवेगळ्या बोर्डांच्या परीक्षांच्या प्रमाणपत्रांच्या दर्जा आणि मूल्यामध्ये मोठीच तफावत असते. त्याचप्रमाणे, अनेक परीक्षा बोर्डांवर उत्तीर्णांचे प्रमाण कृत्रिम रीत्या वाढवण्यासाठी ग्रेस गुण दिले जातात, असे आरोप आहेत. ही रीत बंद केली पाहिजे, एवढेच नव्हे तर अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे जी विद्यार्थ्यांच्या बोर्डातील व शक्यतो अभ्यासाच्या वर्षातील, कामगिऱ्यांच्या पातळ्यांची तुलनात्मक कल्पना देऊ शकेल. स्केलिंग हा एक पर्याय आहे. दुसरे काही पर्याय म्हणजे दहावी व बारावीच्या शेवटी एक मध्यवर्ती परीक्षा घेणे, किंवा प्रत्येक बोर्डामध्ये गुण टक्केवारीच्या स्वरूपात जाहीर करणे. अकादेमिक तज्ज्ञांची एक समिती सर्व संभाव्य पर्यायांचा अभ्यास करेल आणि विद्यार्थ्यांची कामगिरी दर्शवण्यासाठी एक उपाय सुचवेल.

११. विद्यार्थ्यांचे एका संस्थेतून दुसरीकडे जाणे याला उत्तेजन देण्यासाठी स्थलांतर प्रमाणपत्र, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र इत्यादी रद्द करणे अशा प्रक्रियात्मक सुधारणा हाती घेतल्या जातील.

**४.६ समावेशक शिक्षण आणि विद्यार्थी आधार**

उदयाला येणाऱ्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये सातत्यपूर्ण यश मिळण्यामध्ये गुणवत्ता आणि समानता या तत्त्वांवर उभारलेल्या शिक्षण व्यवस्थेचे

स्थान मध्यवर्ती असते, ही सिद्ध झालेली वस्तुस्थिती आहे. सध्याची शिक्षण व्यवस्था, विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था, समावेशक शिक्षणासाठी विशेष गरजा असलेल्या आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या समाजगटांतील मुलांच्या शैक्षणिक गरजा भागवण्याच्या दृष्टीने बहुजिनसी पर्यावरण निर्माण करत नाही आहे. जरी अलीकडच्या दशकांत, ग्रामीण भागातसुद्धा शिक्षणासाठी प्रवेश मिळण्यात सुधारणा झाली आहे, तरी सामाजिक किंवा आर्थिक दृष्ट्या दुर्बल स्तरातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधींमधली विषमता, बहुधा समाजशास्त्रीय आणि परिस्थितिजन्य घटकांतून निर्माण झालेल्या, लक्षणीय अडचणी सहन कराव्या लागतात.

आदिवासी जमातींच्या मुलांचे शिक्षण ही फार मोठ्या चिंतेची बाब आहे. त्यामध्ये, साक्षरतेचे अगदी कमी प्रमाण, प्रवेशाचे फार कमी प्रमाण, बहुसंख्यांनी शाळा सोडणे, आदिवासींमध्ये बालमृत्यूंचे मोठे प्रमाण अशा अनेक गंभीर विषयांचा विचार करायला हवा. केन्द्र व राज्य शासनांनी, शिष्यवृत्त्यांच्या तरतुदींसह सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही, आदिवासी मुलांचे शिक्षण ही अजिबात समाधानकारक गोष्ट नाही. आदिवासी भागात काम करण्यासाठी शिक्षक नसणे ही आदिवासी मुलांच्या शिक्षणाचा अगदी कमी विकास असण्याचे मुख्य कारण आहे. आदिवासी भागात काम करणाऱ्या आदिवासी नसलेल्या शिक्षकांच्यापुढे भाषा आणि परस्परसंवाद यांच्या अभावाची समस्या असते.

अभ्यास उपक्रमांसाठी आर्थिक पुरवठ्याच्या खात्रीसाठी यंत्रणेची, शिष्यवृत्ती किंवा कर्जामधून, गुणी विद्यार्थ्यांना अभ्यास चालू ठेवण्यासाठी मदत होऊ शकते.

त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:

१. लिंगभेद, तसेच, सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक भेदांच्या विषयांची व समस्यांची हाताळणी अभ्यासक्रमात व त्याच्या अंमलबजावणीत विविधतेवर भर देऊन योग्य रीतीने केली जाईल. अभ्यासक्रमात सामाजिक विषमता टाळण्यासाठी सामाजिक न्याय व कायदेशीर उपाय हे विषयही हाताळले जातील.

२. मुलांमध्ये श्रमाच्या प्रतिष्ठेबद्दल सकारात्मक दृष्टिकोनाचा आणि कौशल्यांचा विकास व्हावा म्हणून अभ्यासक्रमामध्ये सुरवातीपासूनच व्यावसायिकपूर्व उपक्रमांचा मोठा समावेश करता येईल.

३. गुणवत्तेला उत्तेजन देण्याच्या आणि समतेच्या पुरस्काराच्या उद्देशाने सुमारे दहा लाख विद्यार्थ्यांना, मूलतः शैक्षणिक शुल्काला, अध्ययन साधनांसाठी आणि निर्वाह खर्चासाठी मदत म्हणून, एक राष्ट्रीय विद्यावृत्ती निधी उभारला जाईल. या निधीतील शिष्यवृत्त्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना उपलब्ध केल्या जातील. दहावी इयत्तेनंतर एका राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेद्वारा निवडलेल्या सर्व वर्गांतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी सर्व विषय क्षेत्रांसाठी, एक स्वतंत्र राष्ट्रीय प्रज्ञा शिष्यवृत्ती योजना अंमलात आणली जाईल.

४. आश्रमशाळा आणि जवळच्या माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/केन्द्रीय विद्यालये/नवोदय विद्यालये यांच्यामध्ये पाठिंबा व सल्ला देणारी समूहशक्ती आणि जोडणीची ताकद जमवण्याचे मार्ग काढले जातील.

५. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना कौशल्ये शिकवण्यावर अधिक भर देण्याची गरज आहे, म्हणून राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळाच्या समन्वयाने शाळांमध्ये नियमित कामाच्या तासांनंतर अधिक कौशल्याधारित कोर्स देण्यासाठी पावले उचलली जातील.

६. अनुभवातून दिसून आले आहे की आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना प्रादेशिक भाषांतून समजण्यामध्ये व शिकण्यामध्ये अडचणी येतात, पण त्याच शिक्षणाचे माध्यम असतात. या अडचणीवर मात करण्यासाठी, जिथे गरज आहे तिथे, बहुभाषिक शिक्षण दिले जाईल, याची खात्री करून घेण्यासाठी पावले उचलली जातील.

७. विशेष क्षमता असलेल्या, सामाजिक दुर्लक्ष, घरात आधाराचा अभाव, योग्य सुविधांचा अपुरेपणा व सहाय्यक साधनांचा अभाव अशा बहुविध समस्यांचा सामना करणाऱ्या व त्यामुळे शिक्षण घेण्यात अडचण येणाऱ्या विद्यार्थ्यांना, विशेषतः लहान गावे व खेड्यांमध्ये असलेल्या शाळांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गरजा भागवण्यासाठी खास मध्यस्थीसारखे उपाय योजले जातील.

८. विशेष गरजा असलेल्या मुलांसाठीच्या सध्याच्या मध्यवर्ती प्रायोजित योजना चालू राहतील व त्यांचा विस्तार अधिक मोठा करून निधीही वाढवला जाईल. राज्य आणि जिल्हा पातळ्यांवर यासाठी व विशेष गरजा असलेल्या मुलांना ओळखून काढून त्यांना मदत करण्यासाठी, विविध योजनांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्यासाठी एका यथोचित यंत्रणेचा विकास केला जाईल.

९. स्थानिक पातळीवर बाल मानसशास्त्रज्ञ व क्लिनिकल मानसशास्त्रज्ञ यांचा समावेश असलेली तज्ज्ञांची अर्धवेळ उपसमिती नेमली जाईल. त्यामुळे कोणतीही शाळा किंवा जिल्हा शिक्षण अधिकारी तृतीय पक्षीय मूल्यांकन किंवा सल्ला हवा असताना तिच्याकडे केस पाठवू शकतील. ही उपसमिती विशेष गरजा असलेल्या मुलांना योग्य व संवेदनशील रीतीने हाताळण्यासाठी शिक्षकांना खास प्रशिक्षण/स्थितिज्ञान देऊ शकतील.

१०. केन्द्र सरकार अध्ययन अक्षमतेच्या समस्येसाठी दीर्घ कालीन योजना करण्यासाठी पुढाकार घेईल, संशोधनामध्ये व प्रशिक्षणामध्ये गुंतवणूक करेल व आवश्यक ती संसाधने उपलब्ध करून देईल.

११. सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या प्रतिकूल स्तरातून येणाऱ्या वंचित विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या काळातील अवघड टप्प्यात जादा सुधारात्मक शिक्षण किंवा मार्गदर्शनाची सुविधा पुरवली जाईल.

१२. स्थलांतरित मुलांचे शिक्षण, त्यांच्या ठिकाणी किंवा स्थलांतराच्या जागी निवासी शाळांची सुविधा पुरवून किंवा इतर कोणत्याही उचित मार्गाने, समान संधी आणि भेदाभेदरहितता या तत्त्वानुसार केले जाईल.

१३. लिंगाधारित भेदाभेद व हिंसा कोणत्याही स्थितीत सहन केली जाणार नाही. विविध प्रकारच्या सकारात्मक कृतींतून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात स्त्रियांची प्रतिष्ठापना, त्यांना कायम ठेवणे व त्यांची उपस्थिती व मजबूत स्थिती ठेवणे अशा गोष्टींचा विकास करण्याचे शासन प्रयत्न करेल. यासाठी, विद्यापीठ प्रशासनाच्या जबाबदारीच्या उच्च स्थानांवर स्त्रियांची भरती व त्यांना पदे देण्याच्या हमीसाठी अधिकाधिक प्रयत्न केले जातील.

१४. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अक्षमता अध्ययनाला बळ देण्यासाठी आर ॲन्ड डी साठी समर्पित निधी राहील. अक्षमता प्रवेशाचे मूलभूत सुविधा, अकादेमिक प्रवेश व कामगिरी यासाठी सामाजिक आणि संशोधन ऑडिटची जबाबदारी घेतली जाईल.

१५. प्रादेशिक असमतोल, डोंगराळ भाग, आदिवासी भाग, वाळवंटी प्रदेश, किनारपट्टीचा भाग अशा वेगवेगळ्या प्रदेशांना भेदात्मक धोरणे या सर्वांवर मात करणे शक्य आहे. गट आणि जिल्हा पातळ्यांवर शैक्षणिक मागासलेपणा ठरवण्याच्या निकषांचा पुनर्विचार केला जाईल आणि नवी सूत्रे उत्क्रांत केली जातील. शिक्षणातील व कौशल्यातील दऱ्या ओळखून शैक्षणिक मागासलेपणा असलेल्या प्रदेशासाठी, तसेच सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या भागांसाठी विशेष मध्यस्थीसारख्या योजनासुविधा देण्यासाठी जिल्हानिहाय मॅपिंग/आढावा घेतला जाईल.

**४.७ साक्षरता आणि जीवनभर शिक्षण**

२ऑक्टोबर१९७८या दिवशी राष्ट्रीय प्रौढ शिक्षण उपक्रम (एनएईपी) सुरू करण्यात आला व तेव्हा प्रथमच प्रौढ साक्षरतेवर भर दिला गेला. गेल्या ४० वर्षांत ग्रामीण व्यावहारिक साक्षरता कार्यक्रम, राष्ट्रीय साक्षरता मिशन, साक्षर भारत अभियान वगैरे अनेक कार्यक्रम सुरू केले गेले. हे सर्व प्रयत्न करूनही भारतात अजून २८०० लाख प्रौढ निरक्षर आहेत. ही संख्या जगातील प्रौढ निरक्षरांच्या संख्येच्या एकतृतीयांश आहे. ही भयंकर मोठी संख्या पाहता प्रौढ निरक्षरता या समस्येकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता अधोरेखित होते.

व्यावहारिक साक्षरता याचा अर्थ वाचन, लेखन व आकडेमोडीचे कौशल्य जे व्यक्ती ज्या विशिष्ट समाजात राहते त्यामध्ये व्यवहार करण्यासाठी पुरेसे असते. व्यावहारिक साक्षरता साध्य करणे हा शैक्षणिक विकासातील अविभाज्य व अपरिहार्य असा घटक आहे. सार्वत्रिक तरुण व प्रौढ साक्षरता हे प्रौढ आणि निरंतर शिक्षण कार्यक्रमांचे मूलभूत ध्येय म्हणून वेळोवेळी समोर आले आहे.

सध्याच्या जगात जीवनभर शिक्षण हा साक्षर समाजाचा निर्णायक घटक मानला जातो पायाभूत .साक्षरता कार्यक्रमातून समाजाच्या सर्व थरांत उत्पन्न झालेल्या साक्षर पर्यावरणातून प्रगतीचे मार्ग तयार होतात. राष्ट्रीय , सामाजिक व आर्थिक विकासासाठी त्याचप्रमाणे लोकांच्या जीवनाची गुणवत्ताच नव्हे तर सुचारु ,मानवी अस्तित्वासाठीही निरंतर शिक्षण महत्त्वाचे आहे जर भारताला जागतिक स्पर्धेत टिकून रहायचे असेल आणि . विकसित देश म्हणून प्रगत व्हायचे असेल तर योग्य रीतीने घडवलेल्या ,निरंतर शिक्षणधोरणातून व कार्यक्रमांतून आपल्या मानवी संसाधनांचा दर्जा सुधारावाच लागेल.

निरक्षरांची प्रचंड संख्या, माहिती संज्ञापन, जागतिकीकरणाची आव्हाने, ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचा उदय, तंत्रज्ञानाचा अफाट विस्तार आणि वाढते दीर्घ जीवनमान या सर्वांमुळे प्रौढशिक्षण धोरणात व कार्यक्रमात महत्त्वाचे बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे आणि वैविध्यपूर्ण व मिश्र अशा भारतीय समाजात साक्षरतेसाठी बहुविध मार्ग चोखाळण्याची गरज आहे. विकास निर्वाहाच्या गरजा वैगेरे गोष्टींचे भान ठेवून, मनोरंजन, साक्षरतेसाठीचा मार्ग लवचिक, विकेंद्रित, आणि संदर्भाधारित ठेवलेला असायला हवा.

त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:

सार्वत्रिक तरुण व प्रौढ साक्षरता साध्य करण्यासाठी स्वमदत गटांना ,शासन ,तसेच ,सेवाभावी संस्थांना , तरुण व स्त्रियांच्या संघटना या सर्वांना गुंतवून घेऊन ,शैक्षणिक संस्था/महाविद्यालये /शाळासध्याच्या कृती अधिक सशक्त करायला हव्यात व बहुआयामी व्यूहरचनेमधून अभ्यासक्रमांची पुनर्रचना करायला हवी.

१. सार्वत्रिक साक्षरता ध्येय साध्य करण्यासाठी संसाधन आधार मंडळांप्रमाणेच सध्याची शिखर संस्था असलेले राष्ट्रीयसाक्षरतामिशन राज्य पातळीचे राज्य ,साक्षरता मिशन,जिल्हा , गटपातळ्यांवरच्या लोक शिक्षा समितीग्रामपंचायत वगैरे , मंडळांच्या अधिकारांची पुनर्रचना व सक्षमीकरण करण्याची गरज आहे सार्वत्रिक . साक्षरता साध्य करण्यासाठी राज्ये जिल्हानिहाय कृतियोजना बनवतील.

२. प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची पुनर्रचना व सबलीकरण करण्यासाठी शासन एक तज्ज्ञांचे सर्वोच्च मंडळ स्थापन करेल आणि प्रौढांच्या साक्षरतेची निष्पत्तीआधीचे अध्ययन व प्रमाणपत्राची ,कौशल्य विकास , त्यातून त्यांना औपचारिक .समकक्षता यांचे मूल्यमापन करण्यासाठी शास्त्रीय निकष विकसित करेल एन एल .शिक्षणव्यवस्थेमध्ये प्रवेश मिळणे सुकर होईलएम ए हे आधीच्या अध्ययनाच्या मान्यतेसाठी व प्रौढ शिक्षणअधिकाऱ्यांच्या व्यावसायिक बढतीसाठी ऍक्रेडिटेड एजन्सीचे भागीदार होतील.

३. प्रौढ साक्षरता कार्यक्रमात कौशल्य विकास व डिजिटल आर्थिक व कायद्याची ,साक्षरता यांचा समावेश केला जाईल.

**४ ८.शिक्षण आणि रोजगारक्षमतेची कौशल्ये**

भारतातील तरुणांची मोठी संख्या वेगाने विकसित देशांमध्ये जात असूनही हा देश जगातील सर्वात तरुण देशांपैकी एक असून ५४ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या २५ वर्षाच्या खालील आहे. असा अंदाज आहे की २०२२ पर्यंत १०४.६२ लक्ष तरुणांना काम करण्यासाठी रोजगाराची आवश्यकता असेल त्यासाठी त्यांना कौशल्याची गरज असेल, तरीही तंत्रविषयक व व्यावसायीक, कार्यक्रमांसाठी मदतीच्या संस्थात्मक व्यवस्था अगदी अपुर्या आहेत.

शिक्षणाच्या व्यावसायिक क्षेत्रात कौशल्यांच्या विकासाची औपचारिक जोडणी व आकादमिक सक्षमता आणणे व विद्यार्थ्यांना सर्वांगीण सवलत देणे यासाठी अगदी अलीकडे प्रयत्न्न झाले आहेत. ते व्याक्तीची वाढ व आर्थिक शिक्षण व कौशल्यांच्या मिश्रणाची गरज आहे. रोजगार क्षमता वाढविण्यासाठी विकासाला आवश्यकच आहे, धिक लक्ष दिल्यास उच्च दर्जाचे व्यावसयिक प्रशिक्षण व त्यातून सामाजिक स्वीकार, प्रतिष्ठा लाभू शकते.

त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:

१. आपल्या विद्यार्थ्यांच्या चांगल्या नोकऱ्यांसाठी व उद्योजकता कौशल्यांच्या विकासासाठी शाळांमध्ये कौशल्यांच्या विकासाचे कार्यक्रम व उच्च शिक्षण व्यवस्था सुधारली जाईल.
२. राष्ट्रीय कौशल्य विकास व उद्योजकता धोरण २०१५मध्ये म्हटल्याप्रमाणे कौशल्यांच्या विकासाचे कार्यक्रम २५ टक्के शाळा व उच्च शिक्षण संस्थांमध्ये एकत्र केले जातील.

३. माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या नोकऱ्यांच्या संधी सुधारण्यासाठी विशिष्ट जिल्ह्यांमध्ये कौशल्यांच्या शाळा निर्माण करण्यासाठी तपशीलवार योजना केली जाईल .
४. माध्यमिक उच्च व तांत्रिक शिक्षणामधले कौशल्य कार्यक्रम अधिक चांगल्या व्हर्टिकल व हॉरिझॉन्टल मोबिलिटी व सामाजिक स्वीकारासाठी एन एस क्यू एफ द्वारे मुख्य शिक्षणात एकत्र केले जातील . कौशल्यांच्या प्रमाणपत्रणासाठी बहुविध प्रवेश वनिर्गमनक्रेडिट ट्रान्स्फरसाठी ,क्रेडिट बँक व्यवस्था , राष्ट्रीय मान्यतेसाठी व निष्पत्ती आधारित मूल्यांकनासाठी राष्ट्रीय व्यावसायिक ,संस्थात्मक सहकार्य प्रमाणकांवर आधारित कौशल्ये देणे यामधून संस्थात्मक यंत्रणा निर्माण केली जाईल.
५. आर पी एलच्या मूल्यांकनासाठी व मान्यतेसाठी अजून कोणतीही यंत्रणा निर्माण केलेली नाहीयासाठी . शासन एका वर्षात अशा कौशल्यांच्या व क्षमतांच्या मूल्यांकनासाठी व मान्यतेसाठी यंत्रणा विकसित करण्याचा प्रयत्न करेलप्रमाणपत्र नसलेले पण कौशल्ये ,यातून औपचारिक शिक्षण व प्रशिक्षण नसलेले . मिळवलेले लोक नोकऱ्यांत प्रवेश मिळवू शकतील.
६. विद्यार्थ्यांना रोजगार नोकऱ्या मिळाव्या म्हणून किंवा त्यांचे स्वतःचे उद्योग करता यावे म्हणून-सेक्टर कौशल्य परिषदेकडून व शाळा महाविद्यालयाकडून/संयुक्त प्रमाणपत्रे देण्याची योजना केली जाईल.

**४शिक्षणामध्ये आय टी सी चा उपय .९.ोग**

पूर्वीच्या ९२/ १९८६ शैक्षणिक धोरणापासून झालेला एक महत्त्वाचा विकास म्हणजे माहिती व संज्ञापन तंत्रज्ञानाचा उदय यातून शैक्षणिक क्षेत्रामध्ये नवे आयाम निर्माण झाले. वेगवेगळ्या मार्गांनी माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगाच्या नव्या शक्यता केवळ विभागाच्या व्यवस्थेसाठीच नव्हे तर प्रत्यक्ष अध्यापन व अध्ययनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शैक्षणिक संधीच्या विस्तारासाठी व शैक्षणिक योजना व व्यवस्था सुधारण्यासाठी निर्माण झाल्या आहेत. सुधारात्मक शिक्षणासाठी, शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी प्रौढ साक्षरता कार्यक्रमांसाठी व्यवस्थापनाचे उच्चशिक्षणात शिकण्याचे साधन म्हणून व प्रशासनाचे व कौशल्य शिक्षणासाठी साधन म्हणून सुद्धा आय टी सी चा वापर होतो. अनेक राज्यांमध्ये सध्या विद्यार्थ्यांच्या व शाळांच्या कामगिरीचे शालेय व्यवस्थापनासाठी, पर्यवेक्षण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानावर आधारित गोष्टींचा उपयोग केला जातोय. गरज कशाची असेल तर ती चांगल्या गोष्टी व प्रयोग चालू आहेत नव्या क्षेत्रात आणखी असेच प्रयत्न समन्वय असलेल्या धोरणाची म्हणजे भारतातील शिक्षण सुधारण्यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढेल.

त्यासाठी पुढील धोरणांनी कृती केल्या जातील:

१. आय सी टी हा सर्व पातळ्यांवरील शिक्षणात व अध्ययनाच्या सर्व क्षेत्रात अंतर्भूत भाग करण्यासाठी एकत्रित प्रयत्न केले जातील.
२. आय सी टी च्या उपयोगाबद्दलचे कोर्स हे अध्यापन-अध्ययन प्रक्रियेला सबल करणारे साधन म्हणून शिक्षक शिक्षण अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनतील.
३. मुलाच्या प्रवेशापासून शाळा सोडेपर्यंतच्या सर्व नोंदींचे ऑनलाइन रेकॉर्ड ठेवणे बंधनकारक राहील.

४. शिक्षक व विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिक्षक व शाळा चालकांच्या कामगिरीचे मूल्यमापन विद्यार्थ्यांचीकामगिरी व रेकॉर्ड व हिशेब ठेवण्यासारखी प्रशासकीय कामे यांच्या पर्यवेक्षणासाठी आय टी आधारित यंत्रणेचा उपयोग केला जाईल.
५. माहिती तंत्रज्ञानावर आधारित गोष्टींच्या उपयोगासाठीचा कार्यक्रम केन्द्र व राज्य सरकारांकडून शालेय व्यवस्थापनासाठी प्राधान्याने केला जाईल. माहिती तंत्रज्ञानावर आधारित रिपोर्टिंग व्यवस्था शालेय व्यवस्थापन व कामगिरी अधिक चांगली करण्यसाठी अतिशय उपयुक्त आहे.
६. आय सी टी कडे स्वतंत्रपणे न पाहता योग्य खोल्यांची उपलब्धता, भरवश्याची वीजव्यवस्था, नेटवर्क कनेक्टिव्हिटी, शाळेच्या परिसराची सुरक्षा, मूलभूत सुविधांची देखभाल वगैरे मूलभूत सुविधांच्या बरोबर पहायला हवे. शैक्षणिक संधी व सुविधा सुधारण्याच्या कार्यक्रमात हे घटक पुरवण्याची काळजी घेतली जाईल. भरवश्याची वीजव्यवस्था ही समस्या असू शकते, म्हणून शैक्षणिक संस्थांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याचा पर्याय हा आय सी टी चा वापर वाढवण्यासाठीच्या कार्यक्रमाचा अविभाज्य भाग होईल.
७. एम ओ ओ सी हे आय सी टी चे दुसरे ॲप्लिकेशन आहे. त्याचा उपयोग आय सी टीने समर्थ बनलेल्या शिक्षणात माध्यमिक उच्च व शिक्षणाच्या पातळ्यांवर होऊ शकतो, विशेषतः परवडणाऱ्या किंमतीमध्ये उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी प्रवेश मिळण्याच्या शक्यता वाढतात.
८. आधीच विकसित केलेले मॉडेल वापरणे हे थोड्या काळासाठी उपयुक्त असते. आधीच विकसित केलेले मॉडेल वापरण्याबरोबरच स्थानिक गरजा भागवणारी ॲप्लिकेशन/मॉडेल विकसित केली जातील. शिक्षक व विद्यार्थ्यांकडून वापरले जाणारे खुले सॉफ्टवेअर वापरून स्थानिक गरजा भागवणाऱ्या भिन्न प्रकारच्या सॉफ्टवेअर/मोबाइल ॲप्सचा विकास करण्यासाठी उत्तेजन दिले जाईल व त्यासाठी सोयी करून दिल्या जातील.

### ४.१० शिक्षकांची प्रगती / विकास आणि व्यवस्थापन

गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांची क्षमता आणि त्यांची प्रेरणा महत्त्वाची असते. शालेय शिक्षणाच्या विविध पातळींवर शिक्षकांच्या कमतरतेची समस्या सोडवण्यासाठी अनेक उपाय केले गेले आहेत. गणित, शास्त्र, भाषा या विषयांतील माध्यमिक शालेय शिक्षकांची कमतरता, नोकरीत असलेल्या शिक्षकांच्या प्रारंभिक तयारीच्या व त्यांच्या नियमित व्यावसायिक विकासाच्या कार्यक्रमांची गुणवत्ता सुधारणे, शिकवणे हा व्यवसाय मानून त्याचा दर्जा वाढवणे, शिक्षकांची प्रेरणा तसेच शिक्षणाच्या निष्पत्तीबद्दलची जबाबदारी यांत सुधारणा करणे, आणि शिक्षकांसाठी असलेल्या शिक्षण संस्थांची व प्रशिक्षकांची गुणवत्ता सुधारणे ही या क्षेत्राततील काही प्रमुख आव्हाने आहेत.

केंद्र व राज्य शासनांच्या अनेक प्रयत्नांनतर देखील प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर मोठ्या प्रमाणात रिक्त जागा, अप्रशिक्षित शिक्षकांची समस्या, शिक्षक प्रशिक्षण संस्थांमधील व्यावसायिकतेचा आभाव, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष वर्गात शिकवण्याच्या पद्धती यांमधील तफावत, शिक्षकांची अनुपस्थिती आणि त्यांची जबाबदारी, अभ्यासक्रमेतर उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग अशा अनेक समस्यांचे समाधान शोधण्याची गरज आहे. अनेक सरकारी शाळांमध्ये पूर्णवेळ मुख्य शिक्षक/ मुख्याध्यापक नाहीत. प्रभावी नेतृत्वाच्या आभावामुळे शिक्षकांमधील बेशिस्त वाढते आणि परिणामी शैक्षणिक दर्जा खालावतो. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्याचे मोठे ध्येय डोळ्यासमोर ठेवून धोरणात्मक उपाय करावे लागणार आहेत.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. राज्य शासनांशी सल्ला मसलत करून शिक्षकांच्या नियुक्तीसाठी एक पारदर्शी आणि गुणवत्तेवर आधारित नियमावली व मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जाणार आहेत. शिक्षक, मुख्याध्यापक आणि इतर शालेय पदांची पारदर्शी आणि गुणवत्तेवर आधारित निवड आणि नियुक्ती प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी राज्य शासने स्वतंत्र शिक्षक नियुक्ती आयोग स्थापन करतील.

२. शिक्षण प्रशिक्षण संस्थांमधील सर्व रिक्त जागा, तसेच मुख्य शिक्षक आणि मुख्याध्यापक ह्या सर्व पदांवर नियुक्ती केली जाईल. मुख्य शिक्षक आणि मुख्याध्यापकांसाठी नेतृत्व प्रशिक्षण अनिवार्य असेल.

३. शिक्षकांच्या योग्य आणि न्याय्य नियुक्तीसाठी, त्यांच्या रिक्त जागा आणि बदलींबाबत पारदर्शी नियम विकसित केले जातील. दूरस्त आणि गैरसोयीच्या भागांत स्थानिक शिक्षकांच्या नियुक्तीचा प्रयत्न केला जाईल.

४. शिक्षकांच्या आवश्यकतेचा (विषय वार व राज्य वार) अंदाज घेण्यासाठी व अप्रशिक्षित शिक्षकांचे प्रशिक्षण ठराविक वेळेत पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाकडून मनुष्यबळ नियोजन केले जाईल. करारावर नोकरीत असलेल्या पात्र शिक्षकांना टप्प्याटप्प्याने तरतूद असलेल्या जागांवर भरती केले जाईल.

५. शिक्षकांची अनुपस्थिती, रिक्त जागा, शिक्षकांकडून जबाबदारीचा आभाव यांसारख्या समस्यांचे निराकरण कठोरपणे व राजकीय एकमताने केले जाईल. अनुपस्थिती आणि बेशिस्तपणावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्राथमिक शाळांतील व्यवस्थापन समितीला व माध्यमिक शाळांच्या मुख्य शिक्षक आणि मुख्याध्यापकांना विशेष अधिकार दिले जातील. हजेरी नोंदवण्यासाठी मोबाईल फोन, बायोमेट्रिक उपकरणांसारख्या तंत्रज्ञानाचे सहाय्य घेतले जाईल.

६. शिक्षकांच्या प्रारंभिक तयारीच्या व त्यांच्या नियमित व्यावसायिक विकासाच्या कार्यक्रमांची परिणामकारकता सुधारण्यावर विशेष भर दिला जाईल. सद्य मर्यादांवर मात करण्याच्या दृष्टीने डिप्लोमा आणि शिक्षक प्रशिक्षण पदवी कार्यक्रम तसेच शिक्षक प्रशिक्षण संस्थांचे कालावधीतील बदल, अभ्यासक्रम व त्यातील रचनेतील बदल आणि या सर्व बाबींची पूर्तता करणे अशा बाबतीत पुनरावलोकन केले जाईल.

७. शिक्षक प्रशिक्षण आणि विकास या विषयाच्या विविध पैलूंचा विचार करण्यासाठी राष्ट्रीय

पातळीवर शिक्षण प्रशिक्षण विद्यापीठ स्थापन केले जाईल. NCERT खाली येणाऱ्या राज्य शिक्षण संस्थांचा विकास करून राज्य शिक्षण प्रशिक्षण विद्यापीठ म्हणून त्यांचे रूपांतर केले जाईल.

८. DIETs, B.Ed. कॉलेजसारख्या शिक्षण प्रशिक्षण संस्थांनी मान्यताप्राप्त असणे हे बंधनकारक राहील. ब्लॉक संसाधन केंद्रांसाठी मानकाचे मापदंड ठरवून दिले जातील.
९. शिक्षक विकास कार्यक्रमांमध्ये विशेषत: जीवन कौशल्य, नैतिक शिक्षण, शारीरिक शिक्षण आणि कला व हस्तकला यांसारख्या अभ्यासेतर उपक्रमांचे महत्त्व समजून घेणे आणि शालेय शिक्षण प्रक्रियेत यांचा प्रभावीपणे वापर करणे असे घटक असतील.
१०. राष्ट्रीय पुरस्काराच्या जोडीने राज्य व जिल्हा पातळीवर शिक्षकांना पुरस्कार दिले जातील. हे पुरस्कार विशिष्ट ध्येयपूर्तीच्या निकषांवर आधारित असतील. पुरस्कारांसाठी शिक्षकांची शिफारस करण्यात शाळा व्यवस्थापन समितीची महत्त्वाची भूमिका असेल.
११. दर्जेदार शिशण देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची शैक्षणिक निष्पत्ती सुधारण्यासाठी शिक्षकांची क्षमता, प्रेरणा आणि जबाबदारी वाढवण्यासाठीच्या कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाईल.
१२. नोकरीत असलेल्या सर्व शिक्षकांसाठी दर तीन वर्षांतून एकदा प्रशिक्षण/ व्यावसायिक विकास कार्यक्रमात भाग घेणे अनिवार्य असेल. केंद्र व राज्य सरकारांकडून या प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाईल.
१३. शासकीय आणि खासगी शाळांमधील शिक्षकांचे नियमित मूल्यांकन अनिवार्य केले जाईल आणि ते त्यांच्या बढती, पगारवाढ अशा गोष्टींशी जोडले जाईल. शिक्षकांना त्यांच्या विषयातील ज्ञान व त्यांचे शिकवण्याचे कौशल्य ह्या गोष्टी तपासण्यासाठी दर पाच वर्षांनी एक मूल्यांकन चाचणी देऊन त्यात उत्तीर्ण व्हावे लागेल.
१४. प्रत्येक राज्यात अनुभवी शिक्षक प्रशिक्षकांचे गट प्रस्थापित केले जातील. SCERT, DIE आणि इतर शिक्षण प्रशिक्षण संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या रिक्त जागा भरून या संस्थांना बळकट करून त्यांची कार्यक्षमता वाढवण्यात येईल.

**४.११ शिक्षणातील भाषा आणि संस्कृती**

बहुभाषिक समाजाला भाषेचे शिक्षणातील महत्त्व समजते. १९६८ साली राष्ट्रीय शिक्षण धोरण ठरावात भारत सरकारने राज्य सरकारांशी सल्ला मसलत करून त्रीभाषिक सूत्र अंमलात आणले. १९८६ / १९९२ च्या धोरणांमध्येही हे सूत्र लागू होते तथापि, काही राज्यांमध्ये या धोरणाच्या अंमलबजावणीत फरक आहेत. भाषा ही भावनेशी निगडीत असल्याने एकच उपाय/ धोरण सर्वांचे समाधान करू शकणार नाही. काळानुरूप स्थानिक लोकांच्या आशा, आकांक्षा आणि प्राधान्यांचा विचार करून राज्यांनी बदल केले जेणेकरून प्रादेशिक, आंतरराज्य तसेच जागतिक गमनशीलतेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना आपले भाषिक कौशल्य विकसित करता यावे.

विद्यार्थी आपल्या मातृभाषेत सर्वात जास्त प्रभावीपणे शिकतात. या उलट इंग्रजी भाषा शिकणे आणि इंग्रजी माध्यम शाळांना मागणी वाढत आहे.

भारताचा मौल्यवान वारसा, वैभवशाली इतिहास, उच्च परंपरा आणि विविध संस्कृती याबद्दल जागृती निर्माण करणे हा शिक्षणाचा उद्देश आहे. जबाबदार नागरिक, शांती, सहिष्णुता, सर्व धर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक संयोग आणि सर्व धर्मांप्रती आदर ही मूल्ये, तसेच शाश्वत विकास आणि जागतिक नागरिकत्व यांचा विकासाला पूरक ठरणारी जागतिक मूल्ये सर्व पातळीच्या विद्यार्थ्यांनी अंगीकृत करण्याचा पुरस्कार शिक्षण करते.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. इच्छा असल्यास, सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेश इयत्ता पाचवीपर्यंत मातृभाषा, स्थानिक किंवा प्रादेशिक भाषा शिक्षणाची माध्यम भाषा म्हणून वापरून शिक्षण देऊ शकतील.
२. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गमनशीलतेच्या दृष्टीने इंग्रजी भाषेचे ज्ञान महत्त्वाचे आहे आणि त्यातून जगाबद्दलचे ज्ञान मिळवता येते. म्हणून मुलांना इंग्रजी लिहिण्यात आणि वाचण्यात कुशल करणे महत्त्वाचे आहे. म्हणून, जर पाचवीपर्यंत माध्यम भाषा मातृभाषा, स्थानिक किंवा प्रादेशिक भाषा असेल तर दुसरी भाषा इंग्रजी असेल आणि तिसऱ्या भाषेबद्दलचे पर्याय ठरवणे हे वैयक्तिक राज्ये आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या हाती असेल (घटनात्मक तरतुदींचे पालन करून).
३. उच्च शिक्षण संस्था, विशेषतः तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण संस्था सर्व विद्यार्थ्यांना भारताचा मौल्यवान वारसा, भाषिक आणि सांस्कृतिक विविधता, आणि ज्ञान प्रणालींबद्दल शिकण्याची संधी उपलब्ध करून देतील.
४. भारतीय संस्कृती, स्थानिक आणि पारंपरिक ज्ञान यांना शालेय शिक्षणात योग्य स्थान दिले जाईल. समता आणि न्याय, सामाजिक न्याय, बंधुभाव, लोकशाही, जबाबदार स्वातंत्र्य आणि मुक्तता, राष्ट्रीय एकात्मता यांसारखी मूल्ये बिंबवण्यासाठी सर्व पातळींवर नैतिक शिक्षण समाविष्ट केले जाईल.
५. भारतीय भाषांची वाढ आणि त्यांच्या विकासामध्ये संस्कृतचे विशेष महत्त्व, तसेच देशाच्या सांस्कृतिक एकात्मेतेमधील संस्कृतचे अद्वितीय योगदान लक्षात घेऊन शालेय आणि विद्यापीठ पातळीवर संस्कृत शिकवण्याची सुविधा जास्त मुबलक प्रमाणात केली जाईल.
६. नागरी जाण, शिस्त, वेळ पाळण्याचे महत्त्व, स्वच्छता, चांगली वागणूक, वृद्ध, गांजलेल्या आणि दुबळ्या लोकांबद्दल सहानुभूती आणि दयाभाव, स्त्रियांविषयी आदर आणि मानवतावादी दृष्टीकोन असे संस्कार विद्यार्थ्यांवर शिक्षण संस्था करतील.

**४.१२ व्यापक शिक्षणातून स्वतःचा विकास**

शिक्षणाच्या संबंध मुलांच्या सर्वांगीण विकासाशी असतो (भौतिक, सामाजिक-भावनिक याबरोबर मानसिक) आणि म्हणूनच फक्त शैक्षणिक यशच नव्हे तर इतर सर्व पैलूंचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. शैक्षणि निष्पत्ती आणि सह-शालेय क्षेत्रात सुधारणा करून मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे व्यापक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. एक सशक्त मूलच प्रभावीपणे शिकू शकते आणि चांगल्या आरोग्यामुळे शिक्षण अधिक चांगले होऊ शकते हे सर्वज्ञात आहे. कुपोषणग्रस्त आणि अशक्तपणा असलेली मुलं मोठ्या संख्येत आहेत आणि यामुळे त्यांच्या शिक्षणातील अडचणी वाढतात, ही काळजीची बाब आहे.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक शिक्षण, योग, खेळ व क्रीडा, NCC, NSS, कला प्रशिक्षण, बाल संसद, स्थानिक कला, हस्तकला, साहित्य व कौशल्ये आणि इतर अभ्याक्रमेतर उपक्रम शाळेच्या दैनिक नित्यक्रमात आणि अभ्याक्रमात समाविष्ट केले जातील. शाळेला अधिकृत मान्यता मिळण्यासाठी वरील गोष्टींची सुविधा असणे अपेक्षित असेल.
२. शाळेतील सर्व अभ्याक्रमेतर उपक्रमांसाठी सरकार / शाळा व्यवस्थापनाकडून निधी राखीव ठेवला जाईल.
३. शाळा व शिक्षण खाते शालेय आरोग्याबाबतच्या अंमलबजावणीसाठी आरोग्य खात्याला सहकार्य करतील. तपासणीसाठी शाळा एक आराखडा तयार करतील आणि वेळापत्रकाचे नियमित पालन होत असल्याची खबरदारी घेतील. 'डिजिटल इंडिया' योजनेअंतर्गत प्रत्येक मुलाच्या आरोग्यविषयक नोंदी तपासण्यासाठी एक ॲप विकसित केले जाईल.
४. सध्या चालू असलेल्या मध्यान्ह भोजन योजनेच्या शालेय पोषण कार्यक्रमाने पेषण पुरवण्यात आणि सामाजिक समतेचा पुरस्कार करण्यात मदत केली आहे. माध्यमिक शाळांनादेखील मध्यान्ह भोजन योजनेची सुविधा देण्यात येणार आहे. स्वैपाकावर देख-रेख ठेवणे व जेवण वाढणे अशी कामे शिक्षकांवर लादली जाणार नाहीत. स्वैपाक एका जागी करून शाळांमध्ये वितरण करणाऱ्या नामांकित सामुदायिक संस्थाकडून ही सेवा घेण्यास शाळांना प्रोत्साहित केले जाईल.

**४.१३ शाळा मूल्यांकन व प्रशासन**

शाळेच्या विकासासाठी सामुदायिक सहभाग आणि पालकांचा सहभाग या गोष्टी काही सूचना, प्रक्रिया, परिणाम/ निष्पत्तीच्या बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जेव्हा ग्रामीण शाळेच्या कार्यात स्थानिक समाज सक्रीय सहभाग घेतो तेव्हाच ती शाळा प्रभावीपणे आपले कार्य करू शकते असे आडळून आले आहे. शाळांमध्ये चांगली प्रशासकीय रचना, सक्ती आणि विनंती यांमध्ये समतोल साधणे, चांगल्या व्यवस्थापन कौशल्यासाठी मुख्य शिक्षक, जिल्हा आणि ब्लॉक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे, शाळेचे कार्य आणि कामगिरीच्या मदतीसाठी माहिती आणि नोंदींचा उपयोग करणे, शाळेची कामगिरी सुधारण्यासाठी सामाजिक साधनांना चालना देणे अशा गोष्टींची आवश्यकता भासते आहे. त्याचबरोबर शाळेचा अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमेतर उपक्रम, पायाभूत सुविधा, शिक्षक व्यवस्थापन, शालेय नेतृत्व, शैक्षणिक निष्पत्ती, विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे समाधान यासारख्या विविध घटकांसाठी गुणवत्ता मूल्यांकन व प्रमाणन व्यवस्थेची गरज भासते आहे. बदलत्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आणि आवश्यक तिथे उपाययोजना करण्यासाठी उचित स्वायत्ततेची चौकट असलेल्या आदर्श आणि जबाबदार अशा शाळा प्रशासन व्यवस्थेची आवश्यकता आहे.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. शाळेच्या गुणवत्तेचं मापन करण्यासाठी; शिक्षक, शालेय नेतृत्व आणि व्यवस्थापन यांची व्यावसायिक क्षमता तपासण्यासाठी, तसेच स्व-मूल्यमापन आणि कार्य-मूल्यमापन करण्यासाठी

विविध मापदंड आणि निर्देश/ संकेत असलेली चौकट देशभरात वापरली जाईल. त्यानंतर शाळांचे या चौकटीवर आधारित मूल्यांकन केले जाईल, दर्जा ठरवला जाईल व त्याप्रमाणे क्रमांकित केले जाईल.

२. शालेय मंडळांच्या प्रमाणनासाठी एक यंत्रणा बसवली जाईल.
३. शाळा व्यवस्थापन समितीच्या RTE कायद्याच्या चौकटीतील अंमलबजावणीबाबत धोरणात्मक चौकटीतील उणिवा केंद्र व राज्य सरकार भरून काढतील, तसेच अंमलबजावणी व देखरेखीबाबत मार्गदर्शक तत्त्वे देतील.
४. पर्यवेक्षणाचा भाग म्हणून शाळा व्यवस्थापन समितीची निवडणूक प्रक्रिया, वारंवारता, कार्यकाल, भूमिका आणि जबाबदारी, कार्य यांबाबतची स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे राज्य सरकारांकडून दिली जातील. शाळा व्यवस्थापन समितीच्या प्रशिक्षणासाठी तरतुदी वाढवण्याचा प्रयत्न राज्य सरकारे करतील आणि शालेय विकास योजना प्रभावीपणे राबवता येण्याच्या दृष्टीने शाळांना त्यांचे अनुदान वेळेत मिळेल याची काळजी घेतील. शालेय विकास योजनेचे आर्थिक अंदाजपत्रक आणि नियोजन प्रक्रियेचा विचार जिल्हा पातळीवर केला जाईल.
५. काही शाळांतील मुख्याध्यापकांच्या नेतृत्वामुळे त्या शाळांची कामगिरी इतर शाळांपेक्षा चांगली असते ह्याचे अनेक पुरावे आढळतात. पाच वर्षे शिकवण्याचा अनुभव असलेल्या शिक्षकांपैकी गुणवत्ता आणि कौशल्याच्या निकषांवर शिक्षकांची निवड करून मुख्याध्यापकांचा एक वेगळा गट तयार करून मुख्य शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या रिक्त जागा विशिष्ट काळमर्यादेत भरल्या जातील.
६. सुधारित शाळा प्रशासनाला नुसतेच शालेय नेतृत्व नव्हे तर एका व्यापक समग्र रचनेची गरज असते. शाळाप्रमुखाची भूमिका आणि जबाबदारी स्पष्ट करणे, शाळाप्रमुखाच्या क्षमतेची रचना स्पष्टपणे मांडणे, मुख्याध्यापक निवडीची एक सशक्त आणि पारदर्शी प्रक्रिया अमलात आणणे, शाळाप्रमुखांसाठी कार्यक्रम, व्यावसायिक प्रगतीसाठी स्पष्ट मार्ग, अखंड व्यावसायिक विकास ह्या गोष्टी त्या रचनेत समाविष्ट आहेत.
७. शाळेच्या शैक्षणिक कामगिरीसाठी आणि सुधारणेसाठी मुख्याध्यापकांना जबाबदार ठरवले जाईल. शिक्षण खाते मुख्याध्यापकांचा किमान कार्यकाल निश्चित करेल.

**४.१४ उच्च शिक्षणात प्रशासकीय सुधारणा**

अलीकडील काही वर्षांत भारतातील उच्च शिक्षणात अभूतपूर्व विस्ताराबरोबरच या क्षेत्रातील वैविध्य प्रतीत झाले आहे. या क्षेत्रातील अनियोजित विस्तारामुळे गुणवत्ता राखणे आणि वाढवणे आव्हानात्मक झाले आहे. प्रशासकीय आणि नियमनाच्या समस्या एकमेकांत गुंतलेल्या आहेत. म्हणून उपक्षेत्रांतील प्रशासकीय आणि नियमनाबाबतच्या दृष्टीक्षेपात असलेल्या समस्यांसाठी वैधानिक परिस्थितीला संदर्भिय करण्याची गरज आहे.

उच्च शिक्षणाच्या प्रशासकीय सुधारणेसाठी खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. मानव संसाधन विकास मंत्रालयाला नवीन ज्ञानक्षेत्रे/ ज्ञानशाखा/ ज्ञानप्रणाली ओळखण्यासाठी; जागतिक पातळीवर शैक्षणिक, अभ्यासक्रम आणि मूल्यांकनाविषयक सुधारणांबद्दल सहाय्य

करण्यासाठी तसेच राष्ट्रीय आकांक्षा आणि बदलत्या जागतिक परिस्थितीशी जुळवून घेण्यासाठी शिक्षण आयोग शिक्षण तज्ज्ञांची एक समिती स्थापन करेल.

२. उच्च शिक्षण संस्थांमधील प्रशासकीय मंडळे बहुसभासदीय केली जातील ज्यात उद्योग क्षेत्रातील व माजी विद्यार्थ्यांही प्रतिनिधित्व करतील. अशा मंडळांच्या रचना व निवडीबाबत स्पष्ट व पारदर्शक मार्गदर्शक तत्त्वे असतील.

३. विद्यापीठासारखी व्यावस्था लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल जिथे पदवीपूर्व, पदव्योत्तर आणि संशोधन अभ्यास एकत्रित केले जातील. पदवीपूर्व, पदव्योत्तर स्तरांवर शिक्षक एकाच वेळी शिकवू शकतील ज्यामुळे शिक्षण आणि संशोधन यांमध्ये समन्वय साधता येईल. विद्यापीठे एक विशिष्ट विद्याशाखानिष्ट न राहता बहुशाखानिष्ट राहतील.

४. १९६८ व १९८६/९२ सालच्या धोरणांतील सूचनांनुसार भारत शिक्षण सेवेची (IES) अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न राज्य सरकारे करतील. ही सेवा भारतभर उपलब्ध असेल व ती मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली असेल. IES अस्तित्वात येईपर्यंत फक्त एकदाच सर्व राज्यांमध्ये UPSC मार्फत राज्यांशी सल्ला मसलत करून शिक्षण क्षेत्रातील शैक्षणिक व प्रशासकीय रिक्त जागांसाठी विशेष भरती केली जाईल.

५. दावे व खटले सोडवण्यासाठी तसेच सरकार वा शाळा / शैक्षणिक संस्थांबद्दलच्या सार्वजनिक तक्रारी सोडवण्यासाठी केंद्रात व राज्यांत विशेष सैक्षणिक न्यायाधिकरणे स्थापिली जातील. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश या न्यायाधिकरणांचे प्रमुख असतील. खटले लवकर निकालात काढण्यासाठी सारांश प्रक्रियेचा लाभ या न्यायाधिकरणांना मिळेल.

६. लोकशाहीच्या हितांचा पुरस्कार करणे, लोकशाही व्यवस्था, प्रशासन, प्रक्रियांना बळकट करणे, तसेच चर्चा, विवाद आणि बहुवैचारिकता यांमधील विद्यार्थी संघटनांच्या सकारात्मक भूमिकेचे सरकार समर्थन करेल आणि त्यांना प्रोत्साहन देईल. तथापि, असे आढळून आले आहे की शैक्षणिक सेस्थांच्या आवारात घडणाऱ्या फूट पाडणाऱ्या घटना आणि मतभेद यांना बाहेरील व्यक्ती आणि कोर्सच्या ठराविक वर्षांच्या कालावधीनंतरही पुढे अनेक वर्षे नोंदणीकृत राहणारे विद्यार्थी कारणीभूत असतात. बाहेरच्या लोकांना आणि शिक्षण संपलेल्या व्यक्तींना विद्यार्थी राजकारणात भाग घेण्यापासून रोखण्यासाठी, शैक्षणिक उपक्रमांत अडथळे निर्माण करण्यापासून रोखण्यासाठी तसेच वसतिगृहात राहून तेथील सुविधांचा गैरवापर करण्यापासून रोखण्यासाठी एक सर्वेक्षण केले जाईल.

७. सर्व HEI तक्रार निवारणाची एक प्रभावी यंत्रणा उभी करतील आणि कोणत्याही विद्यार्थी, शिक्षक वा संघटनेवर दंडात्मक करताना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा (*mens rea* and a*udi alterem partem)*- अवलंब करतील.

८. सध्याची संलग्न व्यवस्था तशीच पुढे चालू राहील परंतु संलग्न महाविद्यालयांची कमाल संख्या शंभर राहील. शंभरापेक्षा जास्त महाविद्यालये आपल्या कक्षेत असणाऱ्या विद्यापीठांची पुनर्रचना केली जाईल.

९. उत्कष्ट दर्जाचा पुरस्कार करणाऱ्या उपक्रमांसाठी सार्वजनिक निधीप्राप्त उच्च शिक्षण संस्थाना प्रमाणित नियमांवर आधारित निधी आणि आर्थिक प्रोत्साहन दिले जाईल. आर्थिक आणि

प्रशासकीय जबाबदारीची स्वायत्तता बाळगण्यासाठी सर्व सार्वजनिक निधीप्राप्त संस्था विशिष्ट टप्पे आणि कालावधी असलेल्या पुढील योजना आखतील.

**४.१५ उच्च शिक्षणामधील नियमन**

रचनेतील प्रमुख राष्ट्रीय संस्था वेगवेगळ्या वेळी, विविध सोयींसाठी आणि संकेतांनुसार स्थपिल्या गेल्या. उच्च शिक्षण क्षेत्रातील नवीन विकास आणि बदलत्या काळानुसार नियमन रचनेचा आढावा घेणे गरजेचे आहे जेणेकरून उच्च शिक्षणच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजांशी ते सुसंगत होईल. उच्च शिक्षणामधील नियमन व्यवस्थेतील अनेक आव्हाने सावधगिरीने हाताळायला हवीत. स्वायत्तता आणि जबाबदारी यांमध्ये समतोल साधणे आवश्यक आहे. आपल्या अखत्यारीत असलेल्या उच्च शिक्षण संस्थांच्या नियमनामध्ये राज्य सरकारे व विद्यापीठेही महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. राष्ट्रीय उच्च शिक्षण शिष्यवृत्ती कार्यक्रमाची व्यवस्था पाहण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभी केली जाईल.
२. डेटा गोळा करणे, संकलित करणे आणि संचित करणारी संस्था म्हणून Central Educational Statistics Agency (CESA) स्थापन करण्यात येईल. उच्च दर्जाचे संख्याशास्त्र कौशल्य आणि व्यवस्थापन माहिती विश्लेषणासाठी, मनुष्यबळ नियोजन आणि पुढील सुधारणांसाठी वापरले जाईल. HEIsना पायाभूत सुविधांची उपलब्धता, नवीन बांधकाम, सुधारणा अशा विविध मापदंडांवर जिओ-टॅग करण्यासाठी CESA नवीन पर्याय विकसित करेल.
३. मान्यताप्राप्त प्रमाणन संस्थाचा सल्ला घेऊन वेळोवेळी विद्यापीठांचा व महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा तपासणे राज्य उच्च शिक्षण परिषदांसाठी बंधनकारक राहील.
४. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेचे स्वतंत्र संकेतस्थळ असेल ज्यावर प्रवेश प्रक्रियेबाबतची साधारण माहिती, शुल्क, शिक्षक, कार्यक्रम, निकाल, नोकरीविषयक, प्रशासन, अर्थ व्यवस्था, व्यावसायिक भागिदार, व्यवस्थापन, शैक्षणिक व अभ्यासक्रमेतर उपक्रमांचे अहवाल आणि संस्थेविषयीची इतर संबंधित माहिती दिली असेल. यामुळे पारदर्शकता बाळगली जाईल.

**४.१६ उच्च शिक्षणात गुणवत्तेची हमी**

अपुऱ्या मूलभूत सोयी-सुविधा, शिक्षकांच्या मोठ्या प्रमाणात रिक्त जागा, कमी गुणवत्तेचे शिक्षक, कालबाह्य शिक्षण पद्धती, संशोधनाचा खालावलेला दर्जा अशा अनेक समस्यांना विद्यापीठांना आणि महाविद्यालयांना तोंड द्यावे लागत आहे. त्यात भर म्हणजे या क्षेत्रातील भौगोलिक, लैंगिक आणि सामाजिक विषमता. ह्या समस्या असणे म्हणजे गौण दर्जाच्या उच्च शिक्षणाचे हे प्रतिबिंब आहे. गुणवत्तेच्या हमीचा भाग म्हणून सर्व संस्था NAAC किंवा NBAकडून प्रमाणित असणे बंधनकारक असेल.

जागतिक पातळीच्या क्रमांकित विद्यापीठांत आपल्या फक्त काहीच उच्च शिक्षण संस्था आहेत ही काळजीची बाब आहे. विद्यापीठांचे जागतिक क्रमांकन संशोधन आणि शिकवण या क्षेत्रातील

कामगिरीचे मूल्यमापन, प्रतिष्ठित शिक्षकगण, नियोक्तांमधील प्रतिष्ठा, संसाधन उपलब्धता, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी आणि उपक्रमांतील वाटा इ. गोष्टींवर आधारित असते. नुकतेच अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी, स्थापत्यशास्त्र विद्यापीठे आणि महाविद्यालयांसारख्या उच्च शिक्षण संस्थांचे क्रमांकन करण्यासाठी MHRDने National Institute Ranking Framework (NIRF) सुरू केले आहे.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. जागतिक प्रमाणनाची पद्धत अभ्यासण्यासाठी एक तज्ज्ञांची समिती केली जाईल. चांगली कामगिरी असलेल्या देशांच्या अनुभवावरून, त्यांच्या चांगल्या कार्यपद्धतींचा अभ्यास करून NAAC आणि NABच्या पुनर्रचनेविषयी सूचना केली जाईल तसेच कार्यप्रणाली, मापदंड, निकष यांविषयीही सूचना दिल्या जातील.
२. प्रत्येक संस्थेच्या मूल्यांकन / प्रमाणनाचे तपशील संस्थेच्या संकेतस्थळावरून सामान्य जनतेस उपलब्ध असतील जेणेकरून विद्यार्थ्यांना आणि इतर व्यक्तींना या माहितीच्या आधारे निवड करता येईल.

**४.१७ मुक्त आणि दूरशिक्षण & MOOCs (मॅसिव ओपन ऑनलाईन कोर्स)**

मुक्त आणि दूरशिक्षण (ओ.डी. एल.) हे वर्धित प्रवेश, कौशल्य विकास, क्षमता बांधणी, प्रशिक्षण, रोजगार मिळवणे, आणि जीवनभर शिक्षण अशा गोष्टी प्राप्त करण्यासाठी उपयोगी असे साधन मानले जाते. भारतातील शिक्षणाच्या विकासामध्ये याचे मोलाचे योगदान आहे. ओ.डी. एल. खाली चाळीस लाखहून अधिक विद्यार्थ्यांची नावनोंदणी झाली आहे. विविध प्रकारचे दूरशिक्षण अभ्याक्रम सार्वजनिक व खाजगी संस्था देऊ करतात. नोकरी सोडून किंवा इतर कोणत्याही कारणास्तव ज्या व्यक्ती नियमित वर्गांना उपस्थित राहू शकत नाहीत अशा व्यक्तींना शिक्षणाची ही सुविधा घेता येते. सध्या प्रामुख्याने इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाकडून, उच्च शिक्षण क्षेत्रात राज्य मुक्त विद्यापीठांकडून तसेच शालेय क्षेत्रात राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थानाकडून मुक्त आणि दूरशिक्षण दिले जाते. तथापि, दूरशिक्षणात गुणवत्तेविषयीच्या काही समस्या आहेत आणि यात सुधारणा करणे आवश्यक आहे.

Massive Open Online Courses (MOOCs) उच्च प्रतीच्या अभ्यासक्रमांसाठी खुला प्रवेश आणि कमी शुल्कात देतात. मुक्त शिक्षणाचे व्यासपीठ उघडून अनेक उच्च शिक्षण संस्था/ विद्यापीठे आपले अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध करत आहेत. त्रान क्षेत्रातील सततच्या सुधारणेमुळे आणि वाढत्या आकांक्षामुळे MOOCsना भविष्यात मागणी वाढण्याची शक्यता आहे. Study Webs of Active-Learning for Young Aspiring Minds (SWAYAM), असे वेब-पोर्टल सिरू करण्याची MHRDची योजना आहे ज्यावर विविध विषयांवर अनेक MOOC उपलब्ध असतील. MOOCचा पुरस्कार, समन्वय, दर्जाचे नियमन आणि सुधार, तसेच प्रमाणन आणि संचित झालेले गुण हस्तांतरणासाठी एक मंडळ स्थापन करण्याची आवश्यकता आहे.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. ODL/MOOCs व्यवस्थेचा पुरस्कार, समन्वय, दर्जाचे नियमन आणि सुधार, तसेच प्रमाणन आणि संचित झालेले गुण हस्तांतरणासाठी एक स्वायत्त मंडळ स्थापन केले जाईल. ODL/ MOOCs च्या

पद्धतशीर विकास आणि नियमनासाठी हे मंडळ नियामावली, मानक आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करेल. तसेच प्रमाणन, संचित झालेले गुण हस्तांतरण, पदव्या प्रमाणित करून बहाल करणे यासाठी हे मंडळ एक यंत्रणा विकसित करेल.

२. परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या स्वायत्त मंडळाने घालून दिलेले नियम, मानक आणि मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित ODL/ MOOCs देणाऱ्या संस्था राष्ट्रीय व स्थानिक गरजांनुसार आपले ODL/ MOOCs प्रमाणित करतील.
३. ODL / MOOCs अभ्यासक्रमाचा पुरस्कार, गुणवत्ता हमी, नवीन बदल आणि पुनर्रचना, आधुनिकीकरण तसेच ODL / MOOCs देणाऱ्या संस्था / विद्यापीठांचे प्रमाणन करण्यासाठी गुणवत्ता हमी यंत्रणा उभी केली जाईल.
४. सर्व ODL संस्था विद्यार्थ्यांसाठी आधार/ मदत सेवा पुरवतील ज्यामध्ये संकेतस्थळावर शिक्षणसामग्री साहित्य भांडार, मुक्त शिक्षण संसाधने, MOOCs, २४/७ मदत सेवा, शिकवणी आणि समुपदेशन सेवा, वेबिनार आयोजन, चर्चा मंच, वेबकास्टिंग, ग्रंथालय सुविधा, व्हर्चुअल प्रयोगशाळा, ई-शिक्षण खंड, ऑनलाईन कार्यक्रम, पाठ स्वाध्याय /गृहपाठ आणि त्यावर वेळेत अभिप्राय, ऑनलाईन परीक्षा, निकाल जाहीर करणे, तक्रार निवारण अशा सुविधा समाविष्ट असतील.
५. व्यावसायिक प्रशिक्षणाच्या वाढत्या मागणीला तोंड देण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सहकार्याने राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थेची पुनर्रचना केली जाईल. राष्ट्रीय मुक्त विद्यालयी शिक्षा संस्थेच्या व्यवस्थापन, देखरेख व पर्यवेक्षणबाबतच्या समस्यांचे उचितपणे निवारण केले जाईल.

### ४.१८ शिक्षणाचे आंतरराष्ट्रीकरण

नव्या जागतिक युगात उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीकरण हा एक अविभाज्य घटक आहे, त्याचप्रमाणे नवीन ज्ञानाची निर्मिती आणि वापरही. आंतरराष्ट्रीकरणात विद्यार्थ्यांची, अभ्यासक आणि शिक्षकांची गमनशीलता; शिक्षणपद्धती आणि संस्कृतींचे आदन-प्रदान; संशोधन सहकार्य; ज्ञान विनिमय आणि क्षमता बांधणी; अभ्यासक्रम आणि अभ्यास निष्पत्तीचे आंतरराष्ट्रीकरण; अभ्यासक्रम विनिमय; व्हर्चुअल गमनशीलता आणि डिजिटल शिक्षण या गोष्टींचा समावेश होतो.

HEIs ची वाढती राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दृश्यमानता, उच्च शिक्षण पुरवण्यात वाढ, विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर प्रवेश, ज्ञान अर्थकारणाला सहाय्य, संयुक्त पदवींचा विकास, नवीन शैक्षणिक पर्यावरणाची निर्मिती आणि वैविध्य अशा अनेक संधी आंतरराष्ट्रीकरणामुळे उपलब्ध होतील.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. जगातील उच्च २०० विद्यापीठांपैकी निवडक विदेशी विद्यापीठांना भारतातील विद्यापीठांशी सहकार्य करून भारतात त्यांची उपस्थिती प्रस्थापित करण्यास प्रोत्साहित केले जाईल. त्यासाठी गरज भासल्यास सक्षम कायदे करण्यासाठी पावले उचलली जातील. विदेशी विद्यापीठे आपली पदवी भारतात शिकत असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना बहाल करू शकतील असे नियम आणि

कायदे रचले जातील. यामुळे या पदव्या त्या मूळ राष्ट्रातही वैध मानल्या जातील.

२. आंतरराष्ट्रीकरण ही दुतर्फी प्रक्रिया असल्याने भारतीय संस्थाही आपली विद्यालये परदेशात उभारू शकतील. हे कायदेशीर पद्धतीने आणि गरज भासल्यास कायद्यात सुधारणा करून केले जाईल.
३. भारतीय विद्यार्थ्यांना परदेशात स्वीकृती मिळावी आणि परदेशी विद्यार्थ्यांना इथे आकर्षित करण्यासाठी HEIsना आपल्या अभ्यासक्रमाचे आंतरराष्ट्रीकरण करून त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर आणून उच्च प्रतीच्या जागतिक पातळीच्या अभ्यासक्रमाला अनुरूप करण्यास प्रोत्साहित केले जाईल. भारतीय संस्कृतीचा आणि संबंधित अभ्यास करण्यासाठी अनेक परदेशी विद्यार्थी भारतात येतात. त्यांच्या गरजा भागवण्यासाठी हे क्षेत्र विकसित केले जाईल.
४. भाषिक अडचणींवर मात करण्यासाठी तसेच उच्च पातळीवरील अभ्यासक्रमामुळे आलेल्या अडचणींना तोंड देण्यासाठी HEIs परदेशी विद्यार्थ्यांना भाषाशिक्षण आणि ब्रिज कोर्सची सुविधा देईल.
५. परदेशी शिक्षकांना भारतीय संस्थांमध्ये शिकवण्यास परवानगी मिळण्यासाठी कायदे व नियमांचे पुनरावलोकन केले जाईल. परदेशी शिक्षक/ विद्यार्थ्यांच्या विसा, नोंदणी, राहण्याची विस्तारित मुदत, कर विषयक नियम व कायदे याबाबतच्या रास्त अडचणींचे योग्य निवारण केले जाईल.
६. सरकार अनुदानित HEIs. अतिरिक्त आर्थिक संसाधनासाठी आंतरराष्ट्रीकरण या घटकाचा समावेश केला जाईल.
७. HEIs च्या मान्यता/ प्रमाणन/ गुणवत्ता हमी याबद्दल ज्या देशांनी कठोर, सशक्त आणि विश्वासार्ह व्यावस्था उभी केली आहे त्या देशांबरोबर सरकार सुसंवाद साधण्यात पुढाकार घेईल. अशा देशांचा एक गट बनवला जाईल ज्यामध्ये संबंधित देशांमध्ये मिळालेली पदवी इतर सभासद देशांमध्ये वैध मानली जाईल.
८. वर,वर आधारित मान्यतेऐवजी गुणांवर आधारित मान्यतेकडे वळण्यासाठी योग्य पावले उचलली जातील.

**४.१९ उच्च शिक्षणातील शिक्षक विकास**

उच्च शिक्षणाच्या गतीमान विस्तारामुळे शिकवण आणि शिक्षकांची गुणवत्ता सुधारणे हा एक महत्त्वाचा घटक आहे. उच्च दर्जाचे शिक्षण देण्याकरता सर्वात कुशल व्यक्तींनी शिक्षण व्यवसायात येणे, शिकवण्यापूर्वी त्यांची पूर्ण तयारी करून घेणे, त्यांचा नियमित व्यावसायिक विकास करणे या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे. विद्यापीठाचे प्रभावी व्यवस्थापन हे उच्च स्तरीय व्यवस्थापन अधिकाऱ्यांच्या व्यावसायिक कौशल्यावर अवलंबून असते. कुलगुरू, रजिस्ट्रार आणि इतर व्यवस्थापन कर्मचारी वर्गाची नियुक्ती पद्धत अनेक समस्यांनी घेरलेली आहे ज्यामुळे HEIsचे कामकाज सुरळीतपणे होऊ शकत नाही. शिक्षण क्षेत्राला विकट व्यवस्थापकीय समस्या सोडवण्यासाठी नेत्रुत्व गुण असलेल्या कुशल व्यावसायिकांची आवश्यकता आहे.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. तज्ज्ञांचे एक मंडळ आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या विद्यापीठे व संस्थांचा नियुक्ती, पदोन्नती, इ. प्रक्रियांचा अभ्यास करेल आणि HEIsमधील शैक्षणिक श्रेष्ठता आणि विद्वता सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवेल.
२. कुशल युवा पीढीने शिक्षण व्यवसायात यावे यासाठी एक राष्ट्रीय मोहीम राबवली जाईल. यासाठी M.Phil, Ph.D संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय वाढीचा तख्ता तयार केला जाईल आणि त्यांची शैक्षणिक सहाय्यक आणि शैक्षणिक सहकारी म्हणून नियुक्ती केली जाईल.
३. नवनियुक्त शिक्षकांसाठी ३-६ महिन्यांच्या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य प्रशिक्षण मंडळे स्थापन केली जातील. उच्च शिक्षण संस्थांमध्ये औपचारिकपणे शिकवण्यासाठी रुजू होण्यापूर्वीनवनियुक्त शिक्षकांनी शिकवण्यात प्रमाणपत्र मिळवणे बंधनकारक असेल. प्रशिक्षण शिबिरात शिकवण व संशोधन पद्धती, ICT चे वापर, अभ्यासक्रम रचना व बांधणी, लैंगिक आणि सामाजिक वैविधतेबद्दल जाणीव, व्यावसायिक नीतितत्त्वे, चांगल्या पद्धतींचा विनिमय, आपल्या अभ्यासक्षेत्रातील विकास या गोष्टी समाविष्ट असतील. प्रशिक्षण शिबिरानंतर त्या त्या संस्थेत ४-६ आठवड्यांचा परिचय कार्यक्रम असेल ज्यामध्ये त्या संस्थेची ओळख, कार्यपद्धती, संस्कृती व आपली भूमिका आणि जबाबदारी जाणून घेता येईल.
४. तांत्रित विकास, ज्ञानाची नवी क्षितिजे आणि विद्यार्थ्यांचा बदलता दृष्टीकोन यामुळे शिक्षकांच्या कार्यातही मोठा बदल घडून आला आहे. या नव्या संदर्भात संमिश्र शिक्षणपद्धती (स्वाध्याय, प्रात्यक्षिक आणि सहाय्यक शिक्षण) अंगीकृत करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या भूमिकेची पुनर्रचना मांडली जाईल. मूल्यांकन आणि परीक्षा पद्धतीतही सुधारणा कराव्या लागतील.
५. सार्वजनिक-अनुदानित संस्थांच्या शैक्षणिक जबाबदारीची खात्री करण्यासाठी शिक्षकांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यांकन करणारी यंत्रणा उभारण्यात येईल.
६. उद्योग, शासनासारख्या इतर क्षेत्रांतील तज्ज्ञांचे शिक्षण क्षेत्रात (आणि उलट) अखंड गमनशीलतेची खात्री करण्यासाठी निवडीबद्दलचे निकष, योग्य नियुक्ती ही धोरणे पडताळण्यासाठी एक यंत्रणा उभी केली जाईल. दोन्ही क्षेत्रात प्रवेश/ निकासाला मान्यता देऊन उपांग शिक्षक/ प्रतिनियुक्तीला प्रोत्साहन दिले जाईल.
७. वरिष्ठ शिक्षक आणि प्रशासकांसाठी छोट्या कालावधीची नेतृत्व शिबिरे आयोजित करण्यासाठी नामांकित उच्च शिक्षण संस्थांना प्रोत्साहित केले जाईल व उच्च स्तरीय नेतृत्व पदांवर निवड व नियुक्तीसाठी हे बंधनकारक ठरवले जाईल. प्रशासकीय आणि व्यवस्थापन कौशल्ये विकसित करण्यासाठी ह्या शिबिरात निर्णय क्षमता, संवेदनशीलता, आर्थिक प्रक्रिया, शौक्षणिक, आर्थिक आणि मानव संसाधन व्यवस्थापन, संघर्ष निवारण, दुर्बलांप्रती संवेदनशीलता इ. विषय हाताळले जातील.

### ४.२० संशोधन, नाविन्यपूर्णता आणि नवे त्रान

जगातील संशोधन प्रकाशनांमध्ये भारताचा एकूण वाटा गेल्या दशकात वाढला असला तरी संशोधनाची गुणवत्ता सुधारलेली नाही. काही अपवाद वगळता, साधारण गुणवत्ता आढळून येते. येथील संस्थांमधील संशोधनाबद्दलचे वातावरण हितावह न वाटल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक परदेशी जाण्याचा

पर्याय निवडतात. उच्च दर्जाच्या संशोधनाचा पुरस्कार करण्यासाठी देशात अनुकूल परिस्थिती निर्माण केली पाहिजे. उच्च शिक्षणाला पूरक असे शैक्षणिक आणि प्रशासकीय वातावरण निर्माण केले पाहिजे. बारत एक सॉफ्ट पॉवर म्हणून उदयास येत आहे आणि या अनुषंगाने एका जाणकार समाजाला नवीन ज्ञान प्रणालींचे शिक्षण देण्याची गरज आहे.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. नविन्यतेला आणि उत्कृष्ठतेला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक आणि खासगी या दोन्ही क्षेत्रात पुढील दशकात उच्च शिक्षण क्षेत्रात किमान १०० नवीन केंद्रे/ विभाग स्थापन करण्यात येतील. खाजगी ट्रस्ट, परोपकारी/ लोककल्याण संस्थांना अशा संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल.
२. वास्तविक समस्या जाणून घेण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण नियोजन आणि प्रशासन विद्यापीठाच्या संशोधन विषयाचे स्पष्ट पुनरेवलोकन करण्यात येईल.
३. एक सॉफ्ट पॉवर म्हणून भारताची स्थिती बळकट करण्याच्या दृष्टीने नवीन ज्ञाननिर्मिती आणि त्याचा वापर आणि उच्च शिक्षणाच्या प्रणालीत या नव्या ज्ञानशाखांना समाविष्य करण्याचे प्रयत्न केले जातील.
४. नविन्यता, सर्जनशीलता आणि उद्योजगता यांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढील ५ वर्षांच्या काळात १०० इन्क्युबेशन केंद्रे स्थापन केली जातील.
५. विशेषतः आंतरशाखा संशोधन आणि अभ्यासात नवीन ज्ञान जतन करण्यासाठी आवश्यक असलेल्या मानव संसाधन विकासाचा पुरस्कार केला जाईल.

**४.२१ शिक्षणासाठी आर्थिक व्यावस्था**

भारताच्या संदर्भात शिक्षण हे सार्वजनिक क्षेत्रात गणले जाते आणि या क्षेत्रात अधिक गुंतवणुकीची गरज आहे. ज्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर खाजगी शिक्षण व्यवस्था आहे त्या देशांत आर्थिक आणि सामाजिक प्रगती होऊ शकली नाही आणि म्हणून मूल्यांचे नुकसान झाले असे आढळून आले आहे. उलटपक्षी, जे देश शिक्षण सार्वजनिक मानतात ते अधिक चांगले व सातत्याने सामाजिक लाभ कमवतात. १९६८ आणि १९८६/९२च्या धोरणात शिक्षणासाठी ६% GDP ची तरतूद सुचवली होती. तथापि, शिक्षणावर प्रत्यक्ष खर्च कायमच यापेक्षा खाली राहिलेला आहे आणि गेल्या काही वर्षांत तो ३.५% वर आहे. यावरून असे दिसते की अपेक्षित लक्ष्यपूर्तीसाठी शिक्षण क्षेत्रातील तरतुदीं वाढवल्या पाहिजेत.

खालीलप्रमाणे धोरणात्मक पुढाकार घेतले जातील:

१. शिक्षण क्षेत्रात किमान ६% GDP इतकी गुंतवणूक वाढवण्याचे दीर्घकाल प्रलंबित असलेले ध्येय पूर्ण करण्यासाठी सरकार प्राधान्याने प्रयत्न करेल.
२. सरकारच्या प्रयत्नांना सहाय्य मिळण्याच्या दृष्टीने खाजगी गुंतवणूक, सेवाभावी संस्था व कॉर्पोरेट क्षेत्रातून गुतवणुकीला प्रात्साहन दिले जाईल. मूलभूत सुविधांमध्ये शिक्षणाचा समावेश, शिक्षणातील गुंतवणुकीसाठी कर सवलत अशी पावले उचलली जातील. साधारणपणे सार्वजनिक अनुदानातून

मूलभूत उपक्रम राबवले जातील व इतर कार्ये खाजगी अनुदानातून साकारली जातील. आर्थिक संसाधने गतीमान करण्यासाठी खाजगी गुंतवणुक आणि संशोधन आणि विकासासाठी तसेच इतर गुणवत्ता सुधारण्याबाबात उपक्रमांत परदेशी गुंतवणूक मिळवणे हे महत्त्वाचे धोरण असेल.

३. नवीन संस्था उभारण्याऐवजी अस्तित्वात असलेल्या संस्थांची क्षमता वाढवणय्वर सरकारचा भर राहील.

४. सरकार-अनुदानित उच्च शिक्षण संस्थांनी आपला निधी वाढवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांकडून निधी, देणग्या, शिक्षण शुल्कात वाढ व त्याचबरोबर वंचित वर्गासाठी शुल्क माफी आणि खाजगी गुंतवणूकीसारखे इतर स्रोत वापरावेत.

५. आर्थिक दुर्बल वर्गासाठी असलेली सध्याची शिक्षण कर्ज योजना अधिक प्रभावी करण्यासाठी तारणाबाबत मुक्ती, कमी व्याज दर, कर्जफेडीसाठी सध्याच्या एक वर्ष काळाऐवजी दोन वर्षे असे बदल करण्यात येतील.

६. उत्कृष्टता आणि प्रभावी कार्यक्षमता साधण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षण संस्थांना कामगिरीवर आधारित अनुदान मिळण्यची अंमलबजावणी केली जाईल.

प्रकरण - ५

**अंमलबजावणी व देखरेख/संनियंत्रण**

२०१६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने नुसत्याच नवीन दिशा घालून दिल्या नसून ते यापुर्वीच्या म्हणजेच सन १९६८१९८६ ,/९२ च्या शैक्षणिक धोरणांनाही धरुन चालत आहे असे दिसते. इथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल ती म्हणजे नियोजित ध्येये साध्य करण्यासाठी व त्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी तशा प्रकारचे प्रत्यक्ष कृती कार्यक्रम वा धोरण आखले पाहिजे तसेच केंद्र व राज्य सरकारला ह्या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी सांघिक भावनेने एकत्र येऊन काम करावे लागेल.ह्यामुळे शैक्षणिक क्षेत्राचा कायापालट होण्यास मदत होईल .

शैक्षणिक क्षेत्रात गुंतवणूक करणारे भागधारक मुबलक प्रमाणात आहेतयात प्रत्येकाने कुठल्या ना कुठल्या . प्रकारचे उल्लेखनिय योगदान केलेले आहे ज्याचा उपयोग शैक्षणिक क्षेत्रातील उचित उद्दिष्टांची पुर्ती करण्यासाठी शिक्षणा ,शिक्षण क्षेत्रातील भेदभाव दूर करणे ,उद्दिष्टपूर्तीसाठी नविन मार्ग मोकळे करणे ,जसे की .होईलचा दर्जा सुधारणे हे होयत्याचबरोबर जागतिकीकरणाच्या युगात आपल्या विद्यार्थांना कठीण आव्हाने पेलण्यासाठी . .आवश्यक ती कौशल्ये शिकवून सुसज्ज करणे

मागील विभागात दिलेल्या प्रत्येक सूचनांसाठी प्रत्यक्ष कृतीचा आराखडा)Framework For Action (बनवून एक तपशीलवार/पद्धतशीर अंमलबजावणीचे धोरण तयार केल्या जाते ,अंमलबजावणीचे धोरण हे ताठर नसते . तर उद्भवणाऱ्या परिस्थितीनुसार व बदलत्या अपेक्षेनुसार त्यात हवे ते बदल करणे आवश्यक असतं नाहीतर ते .धोरण अव्यवहार्य ठरते

यापुर्वीच्या नीतींत केलेल्या शिफारशी दुर्लक्षीत राहण्याचे कारण म्हणजे त्यात असलेल्या यंत्रणेचा/तंत्राचा अभाव होय .परिणामकारक अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या तंत्राचा अवलंब न केल्यास त्या दुर्लक्षित राहतात . अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून प्रत्येक राज्यात त्यांच्या प्रांतिक/क्षेत्रीयसामाजिक व सांस्कृतिक , गरजा लक्षात घेऊन कृती कार्यक्रमाचा आराखडा)FFA) बनवल्यास बरे राहील ,ह्यात संस्थेतील व्यवस्थेचा . ज्यामुळे अपेक्षित उद्दिष्टांची पुर्ती होईल व .कार्यसिद्धी पार पाडणाऱ्या प्रशासनिक प्रक्रियांचा समावेश होतो .दर्जेदार फलनिष्पत्तीही होईल

लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाचा व मोठ्या प्रमाणावर सामाजिक सहभागाचा संदर्भ/मुद्दा लक्षात घेता जिल्हया- प्रत्येक जिल्हयातील ,जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष कृती घडवून येण्यायोग्य आखलेल्या कार्यक्रमामुळे .शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या स्तरापर्यंत त्याची पोच होईल

त्याचबरोबर प्रत्येक शैक्षणिक संस्थेचा पृथकपातळी)micro- level(वर राबवता येईल असा कृती कार्यक्रम आखणे आवश्यक आहे.

परिणामकारक फलनिष्पत्ती न होण्यास आर्थिक बाबी वा साधनामुळे नेहमीच मर्यादा पडतातत्यामुळे सर्व . खाजगी विभाग व इतर सर्व शासकीय संस्था व देशाने मिळून ,शासकीय यंत्रणाशिक्षण क्षेत्रासाठी संसाधन पुरवठा करण्याची जबाबदारी उचलायला हवी तरच शिक्षण प्रणाली व्यवस्थित कार्य पार पाडू शकेल.

अंमलबजावणीच्या धोरणाची रुपरेखा तयार करताना शिक्षण व इतर क्षेत्रे जसे कीशिशु देखभाल ,/संगोपन, आहारखेळ ,आरोग्य ,/क्रीडास्वच्छता व पाणी पुरवठ्य ,ाची साधने यांची सांगड घालायला हवीशिक्षण व . .शिक्षणास उपयुक्त इतर क्षेत्रांमध्ये समन्वय साधण्याच्या तंत्रांना विकसित केले पाहिजे

मागील अनुभवावरुन शिकायचे झाले तर प्रत्येक विभागाला नियंत्रण पद्धतीतंत्रं शोधून काढावी लागतील तसेच , त्यासाठी एक प्रणाली बनवावीलागेलज्यामुळे फलनिष्पत्ती आणि परिणामांना साध्य करण्यात किती प्रगती , लागू पडणाऱ्या तंत्राची व युक्त्यांची दखल घेतल्या .झाली याचे वेळोवेळी मुल्यांकन करुन लक्ष ठेवल्या जाईल राज्या .जाईल राज्यात व केंद्र शासनाकडून नियंत्रणाची प्रक्रिया सूक्ष्म)micro) ते बृहत(macro-level) या दोन्हीही पातळ्यांवर घडेल-ह्या प्रकारामुळे पद्धत अजून पद्धतशीर होऊन अंमलबजावणीच्या धोरणात अधून . .मधून सुधारणा घडवून आणून योग्य तो परिणाम साधता येऊ शकतो

वर आपण कितीही गोष्टी नमूद केल्या असल्या किंवा मार्ग काढले असले तरीही आपल्या देशाच्या जडणघडणीकडे पाहतातसेच त्यात कार्य करणाऱ्या ,एकंदर त्याच्या आकाराचा व वैविध्याचा विचार करता , विभागांचा-शैक्षणिक उप/संरचनांचा विचार करतामाहिती व ज्ञानरुपी अशी गतिशील समाजरचना पाहता असे , दिसते की अशा धोरणापुढे सतत आव्हाने निर्माण होतील व त्यासाठी नियमितपणे परीक्ोषणाची आवश्यक्ता भासेलउद्गामी ./उदयोन्मुख राष्ट्रीय व जागतिक प्रवाहाशी जुळवून घेण्यासाठी नितीचे पाच वर्षांच्या कालावधीसाठी परीक्षण केल्या जाईल.